बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३७ | बुधवार,दि. २३ ऑगस्ट २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# नव्या धोरणात अडकले पुनर्वसनाचे जुने प्रस्ताव



**गोंदिया:–** जिल्ह्यातील अभयारण्य व पुरग्रस्त भागात येणाऱ्या गावांचे पुनर्वसन करण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाने तयार केले होते. त्यानुसार नवेगाव नागझिरा व्याघ्रप्रकल्पातंर्गत येत असलेल्या गावातील सौंदडजवळील श्रीरामपूर येथे पुनर्वसन करण्यात आले.मात्र जिल्ह्यातील पुरग्रस्त व पुराने बाधित होणाऱ्या चार ते पाच गावांच्या प्रस्तावांना अद्यापही मंजुरी मिळू शकलेली नाही. काही पुनर्वसनाचे प्रस्ताव हे विभागीय आयुक्त कार्यालयात तर काही मंत्रालयात गेल्या अनेक वर्षापासून अडकून पडल्याने त्या गावांचा पुनर्वसनाचा प्रस्ताव आजही तसाच कायम राहिला. परंतु शासनाने या पुनर्वसन धोरणाच्या अमलबंजावणीतच बदल केल्याने ज्या गावांचे प्रस्ताव आधी मंत्रालयात गेले असले तरी त्या प्रस्तावांना पुन्हा आता महसुल व वनविभागाने १४ ऑक्टोंबर २०२२ रोजी काढलेल्या नव्या शासन निर्णयानुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या मंजुरीची आवश्यकता निर्माण झाली आहे.त्यामुळे त्या तारखेच्या आधी जरी पुनर्वसनाचे प्रस्ताव मंत्रालयात गेले असले व ते मंजूरीच्या प्रतिक्षेत असतील अशा सर्व प्रस्तावांना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग जोपर्यंत मंजुरी देत नाही तोपर्यंत पुनर्वसनाचा मार्ग प्रलबिंत राहणार आहे.

या धोरणामुळे जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील कोदामेढी, गोंदिया तालुक्यातील कासा, काटी, वडेगाव व कटंगटोला या पुरबाधित गावांचे प्रस्ताव खरंच गरज आहे का हे तपासून पाठविण्यात येणार आहे. यामध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाला पुनर्वसित गावाातील बाधित कुटुंबासोबत चर्चा करुन नव्याने आराखडा सादर करावायाचा आहे

सडक अर्जुनी तालुक्यातील कोदामेढी या गावात सन १९९४ वर्षात आलेल्या पुरामुळे घरे बाधित झाली होती. त्या पुरग्रस्त बाधित ४२ कुटुंबांना कोदामेढी येथेच ४२ भुखंडाचे वाटप करण्यात आले. त्या पुनर्वसीत ठिकाणी नागरी सुविधा उपलब्ध करण्यासाठी कामाचे अंदाजपत्रक शासनाकडे पाठविण्यात आले,मात्र अद्यापही ते मंजूर झाले नाही. या कामाकरीता प्रस्तावित अंदाजपत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक मंजूरीसह संबंधित यंत्रणेकडून तयार करण्यात आले होते,मात्र त्या अधिकचा खर्च दर्शविण्यात आले नाही. त्यामुळे प्रस्ताव पुनश्च सादर करण्याकरीता उपविभागीय अधिकारी, अर्जुनी/मोरगाव १७/०८/२०२१ रोजी कळविण्यात आले होते. मात्र त्याकडे विभागाने दुर्लक्ष केल्याने तो सुधारित प्रस्ताव सादर आजही होऊ शकला नाही.

त्याचप्रमाणे गोंदिया तालुक्यातील किन्ही गावात सन २००५ वर्षी आलेल्या पुरामुळे बाधीत कुटुंबाचे पुनर्वसनाकरीता किन्ही, कटंगटोला व मरारटोला या तिन्ही गावाचे एकत्रित पुनर्वसनाचे प्रस्ताव २०/११/२०१२ रोजी विभागीय आयुक्तांना सादर करण्यात आले होते.तो प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयाने ८/१२/२०१२ रोजी शसनास सादर केले होते. त्यानंतरही हा प्रस्ताव आजही मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे. जिल्ह्यातील सर्वच प्रस्ताव हे विभागीय आयुक्त व मंत्रालय स्तरावर १४ ऑक्टोंबर २०२२ पुवी गेले असले तरी ते मंजुर न झाल्याने नव्या शासन धोरणानुसार आता पुन्हा नव्याने या गावांचे प्रस्ताव नागरिकांची आवश्यकता विचारात घेऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या मंजुरीने पाठवायचे असल्याने जिल्ह्यातील हे प्रस्ताव आपत्ती व्यवस्थापन विभाग कधी पाठवतेय याकडे लक्ष लागले आहे.

नव्या शासन धोरणानुसार अतिवृष्टीमुळे आलेला पूर, जमिनीचे भुस्खलन किंवा जमिनीला मोठयामोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ.नैसर्गिक आपत्तीमुळे एखाद्या ग्रामीण भागातील बाधित गावाचे/क्षेत्राचे/वाडीचे/तांड्याचे नवीन ठिकाणी स्थलांतरीत करुन कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासंदर्भात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण निर्णय घेईल असे म्हटले गेले आहे.

तसेच वरीलबाबीमुळे गावांचे/क्षेत्राचे/वाडीचे/तांड्याचे कायमचे पुनर्वसन पूर्ण होण्यापुर्वी जर तात्पुरते पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मत असल्यास, ते तसा प्रस्ताव राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे पाठवतील व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण त्यावर अंतिम निर्णय घेणार आहे. नव्या धोरणानुसार सुरवातीलाच आपत्ती व्यवस्थापन विभागाची मंजुरी आवश्यक केल्याने जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील सर्वच जिल्ह्यातील अशा प्रस्तावांना आता परत आपती व्यवस्थापनाच्या मंजुरीने सरकारकडे पाठवावे लागणार आहे.

### नव्या धोरणानुसार पुर्नवसित ठिकाणामध्ये अनुज्ञेय नागरी सुविधा

**१) स्थानिक गावांमधील अंतर्गत रस्ते आणि जवळच्या मुख्य रस्त्यांशी जोडणारा बारमाही रस्ता.**
**२)मलनिस्तारणाचा निवारा करण्यासाठी बंदिस्त गटारे.**
**४) केंद्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार स्वच्छ पाणीपुरवठा.**
**५) गुरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी हौद.**
**६) सुयोग्य ग्रामपंचायत भवन.**
**७) सार्वजनिक शौचालय (स्वच्छतागृहांसह स्वच्छतेच्या सुविधा).**
**८) वैयक्तिक एकल विद्युत जोडणी (किंवा सौर ऊर्जा सारख्या ऊर्जा संवर्धन स्त्रोतांशी जोडणी)प्रत्येक घरगुती आणि सार्वजनिक प्रकाश योजना.**
**९) अंगणवाडी (बालकांना आणि आईला पुरक पोषण सेवा अंतर्गत).**
**१०) मुलांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षण कायदा २००९ च्या तरतुदीनुसार शाळा (कलम ३५/२००९ नुसार)**
**११) मुलांच्या खेळाचे मैदान.**
**१२) प्रत्येक १०० कुटुंबासाठी एक समाजमंदीर.**

# महामार्गावर बसविणार माहिती फलकासह २६ स्पीडब्रेकर

**गोंदिया:** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ अर्जुनी मोरगाव ते रामटेक मार्गाचे बांधकाम पूर्ण होऊन एक दिड वर्षाचा कालावधी लोटत असताना महामार्गावर वन्यजीवांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कसलीच माहिती किंवा फलक अथवा गतिरोधक बसविण्यात आले नव्हते. परिणामी, दहा दिवसांपुर्वी मुरदोली जंगल पुरिसरात कारच्या धडकेत एका वाघाचा बळी गेला. दरम्यान, या घटनेमुळे पुन्हा एकदा वन्यप्राणी सुरक्षित नसल्याची भावना वन्यजीव प्रेमीकडून व्यक्त करण्यात आली. आता मात्र, या घटनेमुळे वनविभागाला जगा आली असून या मार्गावर २६ स्पीड ब्रेकर व माहिती फलक बसविण्याच्या हालचाली वन विभागाकडून सुरु झल्या आहे.




### वाहनांना ताशी २० किमी वेगाची परवानगी

**अपघातात वाघाचा मृत्यू झाल्याची ही पहिलीच घटना असल्याने वन व वन्यजीव विभागाने या मार्गावर सुरक्षा व्यवस्था व उपाययोजनांनी तयारी गांभीर्याने घेत मुंडीपार-मुरदोली महामार्गावर आवश्यक ठिकाणी २६ स्पीड ब्रेकर तयार केले जाणार आहेत. त्याचप्रमाणे २० माहिती फलक लावण्यात येणार आहेत. तसेच या मार्गावर ताशी २० कि.मी.वाहने फक्त वेगाने चालवण्यास परवानगी राहणार आहे. तर तशा सुचना वन्यजीव व वनविभागाने दिल्या आहेत.**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ अर्जुनी मोरगाव-रामटेक रस्त्यावर मुरदोली जंगलातून जात असताना कारच्या धडकेत वाघचा मृत्यू झाला. ही घटना १० ऑगस्ट रोजी रात्री ८.३० वाजता उघडकीस आली. या महामार्गावर वन्यजीव संरक्षणाच्या संदर्भात उपाययोजना केली जात नसल्याने वाहने भरधाव वेगाने जतात. वाघाचा मृत्यू झाल्याने वनविभाग व वन्यजीव विभाग खडवडून जागे झाले आणि या महमार्गावर तातडीने २६ स्पीड ब्रेकर बसविण्याबाबतचा आराखडा तयार केला आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ नागझिरा अभयारण्य आणि वनविभागाच्या जंगलातून मुरदोली, गोरेगाव मार्गे जातो. या जंगल परिसरात सद्यस्थितीत वाघ, बिबट्या, अस्वल, सांबर, चितळ, हरिण या दुर्मिळ प्रजातीचे वन्यप्राणी या मार्गावर फिरत असतात. मात्र या महमार्गावरुन वाहने इतक्या वेगाने जातात की वन्यजीव या वाहनांच्या तावडीत सापडत असून वाहनाच्या धडकेत अनेक वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे. तर वाहन चालकही गंभीर जखमी झाल्याच्या नोंदी आहेत.

### २९ऑगस्टला क्रीडा दिनाचे आयोजन

**गोंदिया :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद गोंदिया व जिल्ह्यातील विविध क्रीडा संघटना यांच्या विद्यमाने हॉकीचे खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा २९ ऑगस्ट हा जन्म दिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

## नवभारत साक्षरता कार्यक्रम सर्वेक्षणावर विमाशि संघाचा बहिष्कार

**गोंदिया :** राज्यातील मराठी शाळांचा दर्जा खालावत चालला आहे.शाळांचा दर्जा उंचाविण्यासाठी शिक्षकांना अधिक वेळ द्यावा लागणार आहे.असे असताना त्यांना अशैक्षणिक कामे देऊन मराठी शाळा डबघाईस आणण्याचा हा प्रकार आहे.या प्रकारावर विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ तीव्र खंत व्यक्त करीत असून या सर्व्हेक्षणावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेत असल्याचे पत्र आयुक्त (शिक्षण), शिक्षण संचालक (योजना) यांना सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी पाठविले.

"नवभारत साक्षरता कार्यक्रम – सर्वेक्षण' अंतर्गत १७ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत निरक्षर सर्व्हेक्षण, शाळाबाह्य विद्याथी सर्व्हेक्षण शिक्षक,मुख्याध्यापक,केंद्रप्रमुख यांच्या माध्यमातून करण्याचे आदेशित आहे. नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाल्याबरोबर १ ते २० जुलै सेतू अभ्यासक्रम, त्या अभ्यासक्रमाची पूर्वचाचणी नंतर उत्तर चाचणी, १७ ऑगस्ट ते १९ ऑगस्टदरम्यान पायाभूत चाचणी व त्याचा निकाल हे संपत नाही तर १७ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत निरक्षर सर्व्हेक्षण, शाळाबाह्य विद्यार्थी सर्व्हेक्षण अशा विविध अशैक्षणिक कामांमुळे राज्यातील शिक्षक वैतागून गेले आहेत. या सर्व अशैक्षणिक कामांमुळे शिक्षकांना अभ्यासक्रम कधी शिकवायचा हा प्रश्न पडला आहे.

सदर सर्वेक्षणाच्या आदेशाने




राज्यातील शिक्षकांत तीव्र संतापाचे भावना निर्माण झालेली आहे. शिक्षकांना प्रत्यक्ष शिक्षणाव्यतिरिक्त (जनगणना, निवडणूक विषयक कामे वगळता) कोणतेच अशैक्षणिक कामे शिक्षकांना देण्यात येऊ नये अशी ठ्रए – २००९ मध्ये तरतूद आहे. परंतु, सतत चालणाऱ्या मतदार नोंदणी प्रक्रियेत शिक्षकांना गुंतवून ठेऊन त्रस्त केले जात आहे.

आधीच राज्यातील मराठी शाळांचा दर्जा खालावत चालला आहे. त्यातल्या त्यात शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊन मराठी शाळा डबघाईस आणण्याचा हा प्रकार असल्याचे मत आमदार सुधाकर अडबाले यांनी व्यक्त केले. या प्रकारावर विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ तीव्र खंत व्यक्त करीत असून आयुक्त (शिक्षण) पूणे, शिक्षण संचालक (योजना) पूणे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, प्रधान सचिव, शिक्षण संचालक (प्राथ.) पूणे यांना या सर्व्हेक्षणावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेत असल्याचे पत्र विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी पाठविले.

# भंडारा-गोंदिया लोकसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने कसली कंबर

## प्रफुल्ल पटेलांच्या नेतृत्वात मोर्चेबांधणी



**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुट पडून खासदार शरद पवार व अजित पवार असे दोन गट पडले आहेत. मात्र खा. प्रफुल्ल पटेल हे अजित पवार यांच्यासोबत असून त्यांनी भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रावरील राष्ट्रवादी काँग्रेसचा दावा कायम ठेवत आगामी लोकसभा निवडणुकीसाठी या मतदारसंघातून मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात २३ व २४ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या मेळावा आयोजित केला असून यच मेळाव्यातून खा. प्रफुल्ल पटेल हे लोकसभा निवडणुकीचा शंखनाद करणार असल्याची माहिती आहे.

अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारला पाठिंबा देत मंत्रीपदाची शपथ घेतली. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महायुतीचा जागा वाटपाचा नेमका कोणता फार्म्यूला ठरतो हे येणारे काळच सांगेल. भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्र महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेसकडे होता. पण आता राष्ट्रवादी काँग्रेसमधील नव्या समीकरणामुळे यातही पेच निर्माण झाला आहे. तर या मतदारसंघात विद्यमान खासदार हे भाजपचे आहेत. त्यामुळे महायुतीत यावर नेमका कसा तोडगा काढला जातो हे महत्वपूर्ण ठरणार आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसने भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रावरील दावा सोडलेला नाही, तर महाविकास आघाडीचेसुद्धा जागा वाटप केले नसले तरी काँग्रेसने या मतदारसंघावर दावा सांगत मोर्चे बांधणीला सुरुवात केली आहे. राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीसुद्धा दोन्ही जिल्ह्यातील



काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची हा मतदारसंघ काँग्रेस लढवावा अशी इच्छा असल्याचे सांगत त्यांनी अनुकूलता दर्शवीत मोर्चेबांधणीला सुरुवात केली. त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसनेसुद्धा यासाठी कंबर कसली आहे. याचीच सुरुवात २३ व २४ ऑगस्ट रोजी गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात कार्यकर्ता मेळाव्यातून करणार आहे. खा. प्रफुल्ल पटेल हे य दोन्ही मेळाव्याला उपस्थित राहून लोकसभा निवडणूक तयारीचा शंखनाद करणार आहेत. या मेळाव्याच्या भव्य आयोजनासाठी माजी आ.राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांनी जोरदार तयारी सुरु केली आहे.

### बुथ कमिटी व सक्रिय सदस्य नोंदणी वाढविण्यावर भर

**राष्ट्रवादी काँग्रेसने या मेळाव्याच्या माध्यमातून प्रत्येक गावात बुथ कमिटी बळकट करणे व सक्रिय सदस्यांनी संख्या वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. या मेळाव्यात खा. प्रफुल्ल पटेल व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण करणार असल्याची माहिती आहे.**

**गोंदिया-भंडारा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस खा. प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वात मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. कार्यकर्ता मेळाव्यातून पक्ष बांधणी व निवडणुकांच्या अनुषंगाने संवाद साधण्यात येणार आहे.**

**राजेंद्र जैन, माजी आमदार राष्ट्रवादी काँग्रेस**

## लॉजवर प्रेयसीसोबत घालवली रात्र; सकाळी प्रियकर मृतावस्थेत

**भंडारा** : शहरातील बसस्थानकासमोरील हिरणवार लॉजवर प्रेयसीसोबत रात्र घालविणाऱ्या प्रियकराचा अचानक मृत्यू झाला. सकाळी ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली आणि खळबळ उडाली. कृष्णा रायभान धनजोडे (२३) असे मृतकाचे नाव असून तो नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील केशोरी येथील रहिवासी आहे. लॉजमधून शक्ती वाढवणाऱ्या गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत.

मृत कृष्णाचे गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील झारपाडा येथील एका तरुणीवर प्रेम होते. दोघेही १९ ऑगस्ट रोजी एकमेकांना भेटण्यासाठी भंडारा येथे आले होते. दिवसभर शहरातील प्रेक्षणीय स्थळी दोघेही फिरले. सायंकाळी खरेदी केल्यानंतर दोघांनी लॉजवर एकत्र रात्र काढली. सकाळी लवकर उठून मुलीने कृष्णाला उठवण्याचा प्रयत्न केला.

पण त्याने काहीच उत्तर दिले नाही. तो काहीच हालचाल करत नसल्याचे लक्षात येताच तरुणीने तातडीने लॉजच्या कर्मचाऱ्यांना याची माहिती दिली.कृष्णाला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. त्याच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप कळू शकले नाही.

## ग्रामीण रुग्णालयाची नवी इमारत १५ दिवसात रुग्णांच्या सेवेत दाखल होणार

**देवरी–** येथील ग्रामीण रुग्णालयाची नवीन इमारत येत्या १५ दिवसात रुग्णांच्या सेवेसाठी खुली करणार असल्याची ग्वाही ,नागपूर क्षेत्राच्या आरोग्य उपसंचालिका डॉ. कांचन वानेर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.




डॉ. वानेर या देवरी ग्रामीण रुग्णालयाच्या पाहणीसाठी देवरी येथे आल्या होत्या. त्यांनी ग्रामीण रुग्णालयाच्या जुन्या इमारतीची पाहणी करून तेथील समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर त्यांनी नवीन इमारतीचे सुद्धा अवलोकन केले.

देवरी तालुक्यातील आदिवासी बहुल दुर्गम भागातील रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने देवरी ग्रामीण रुग्णालाची निर्मिती करण्यात आली. सध्या कार्यरत जुनी इमारत ही पूर्णतः जीर्ण झाली असून ठिकठिकाणी भिंतींना तडे गेले आहेत. याशिवाय या इमारतीमध्ये पावसाळ्याच्या दिवसात रुग्ण असेलेल्या वॉर्डीमध्ये पावसाचे पणी गळत असल्याने रुग्णांचे हाल होत आहेत.

या रुग्णालयासंबंधी समस्यांची तक्रार विद्यमान आमदार सहसराम कोरोटे यांना करण्यात आल्याने त्यांनी गेल्या जुलै महिन्यात सदर इमारतीची पाहणी केली होती. त्यामुळे आमदार कोरोटे यांनी नवीन इमारतीचे लोकार्पण पंधरा दिवसाच्या आत करून रुंग्णांची हेळसांड थांबविण्याच्या सूचना आरोग्य विभागाला दिल्या होत्या. मात्र आरोग्य विभागाने आमदारांनी केलेल्या सूचनांना गांभीर्याने घेतले नसल्याचे निदर्शनात आल्याने गेल्या १५ ऑगस्ट रोजी आमदार कोरोटे यांनी या इमारतीचे लोकार्पण उरकून घेतले. याशिवाय श्री कोरोटे यांनी या नवीन इमारतीमधून येत्या ८ दिवसात रुग्णसेवा सुरूकरण्याच्या सूचना आरोग्य उपसंचालकांना दिले.

यामुळे उपसंचालक डॉ.वानेर यांनी रुग्णालयाला भेट देत नवीन इमारतीसाठी संबंधित विभागांकडून लागणारे नाहरकत प्रमाणपत्र येत्या पंधरा दिवसात मिळविण्याची कार्यवाही पूर्ण करणार असल्याची माहिती दिली. इमारत पूर्ण झाली असून आरोग्यसेवा देण्यास कोणतीही अडचण नसल्याचे त्यांनी यावेळी बोलताना दिले.अग्निशमन, पाणी, आणि वीजेची उपलब्धता लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. किमान पंधरा दिवसात बाह्यरुग्ण सेवा तरी सुरू करण्याच्या सूचना त्यांनी वैद्यकीय अधीक्षकांना दिल्याचे सांगितले.

परिणामी,नवीन इमारतीचे बांधकाम संथगतीने करून रुग्णांना वेठीस धरण्याचा प्रकार हा आमदार सहसराम कोरोटे यांनी उचलेल्या पावलांमुळे उशिरा का होईना आरोग्य विभाग खडबळून जागे झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

# त्या ६६ रुग्णवाहिका चालकांचा वाली कोण?

## रुग्णवाहिकेच्या चालकांवर उपासमार: १८ महिन्यांपासून मानधन रखडले

**गोंदिया:** रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी चोवीस तास दक्ष असणाऱ्या १०२ क्रमांकाच्या रुग्णवाहिका चालकांना गेल्या १८ महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबियावर आर्थिक संकट ओढवले आहे. विशेष म्हणजे, यापुर्वी एनआरएचएम अंतर्गत या चालकांची नियुक्ती असताना त्यांना आता खासगी कंपनीकडे कंत्राटी पद्धतीने वळती केले आहे. असे असताना चलकांनी या प्रकरणी न्यायालयात दाद मागितली आहे. त्यामुळे त्यांना जिपकडून वेतनच दिले जात नाही. पणिामी या रुग्णवाहिकांचा वाली कोण? असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

गंभीर आजाराने ग्रस्त, आपत्कालीन परिस्थितीत गर्भवती महिलांना रुग्णवाहिका सेवा दिली जाते. त्यासाठी रुग्णवाहिका चालकांना प्रत्येक क्षणी सतर्क राहावे लागते. यापुर्वी एनआरएचएममधून रुग्णवाहिका चालाकांची नियुक्ती होत होती. मात्र, गेल्या चार वर्षांपासून एनआरएचएमला वगळून खासगी कंपनीमार्फत कंत्राटी पद्धतीवर चालकांची नियुक्ती दिली जात आहे. तर गेल्या वर्षी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून चंद्रपूर येथील एका खासगी कंपनीशी करार करण्यात येत असतना रुग्णवाहिका चालक संघटनेतर्फे एनआरएचएम अंतर्गतच नियुक्ती करण्याच्या मागणीला घेऊन न्यायालयात धाव घेतली होती. तेव्हापासून हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. चालकाच्या मते जिल्हा परिषदेकडे चालकांच्या मानधनाचा निधी प्राप्त झाला असताना प्रकरण न्यायालयात असल्याचे सांगून त्यांना मानधन देण्यात येत नाही. विशेषत: रुग्णवाहिका चालकांना महिन्याकाठी १३.५०० रुपये मानधन दिले जात असून त्यापैकी पीएफ व इतर योजनांतर्गत मानधन कपात करुन ९,००० रुपये चालकांच्या खात्यात जमा होतात. कमी मानधनामुळे वाहनचालक आधीच आर्थिक संकटात असून, अशा परिस्थितीत गेल्या १८ महिन्यापसून म्हणजे मार्च २०२२ पासून आतापर्यंत मानधन मिळालेले नाही. त्यामुळे चालकांच्या कुटुंबियावर आर्थिक संकट कोसळले आहे. मागणीला घेऊन चालकांनी आंदोलन ही केले असले तरी याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने चालकांमध्ये संतापाची लाट आहे.

### तर शासन जबाबदार राहणार

**जिल्ह्यात ६६ रुग्णवाहिका चालक आहेत. चार वर्षांपुर्वी एनआरएचएमच्या माध्यमातून रुग्णवाहिका चालकाची नियुक्ती करुन मानधन केवळ एनआरएचएमअंतर्गत दिले जात होते. मात्र चार वर्षापासून खासगी संस्थेतून रुग्णवाहि चालकांची नियुक्ती केली जात आहे. एनआरएचएम अंतर्गतच रुग्णवाहिका चालकाची नियुक्ती करावी अशी संघटनेची मागणी आहे. मात्र याकडे दुर्लक्ष केल्याने गेल्या १८ महिन्यांपासून मानधन मिळाले नाही. याच विवंचनेतून एका चालकावर रुग्णालयात भर्ती करण्याची वेळ आली आहे. तर भविष्यात काही कमी जास्त झाल्यास सर्व जबाबदारी शासनाची राहणार आहे.**

**शेखर चंद्रीकापुरे,** जिल्हाध्यक्ष, कंत्राटी चालक संघटना, गोंदिया

### जिल्हा परिषदेची भूमिका नाही

**यापुर्वी रुग्णवाहिका चालकांना एनआरएचएम अंतर्गत घेतले असले तरी त्यावेळीही एका कंपनीच्या माध्यमातूनच घेण्यात आले होते. तर त्या कंपनीचा करार पूर्ण झाल्यामुळे दुसऱ्या कंपनीशी करार करण्यात आले आहे. मात्र त्याला चालकांनी विरोध केला आहे. हा संपूर्ण राज्यातील असून राज्य शासनाच्या अख्त्यारीतील असल्याने जिल्हा परिषदेची यात कसलीच भूमिका नाही. तेव्हा जो कही निर्णय आहे तो शासन स्तरावर घेतला जाईल.**

**अनिल पाटील,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया



### तरीही देताहेत सेवा

**रुग्णवाहिका चालकांन गेल्या १८ महिन्यापासून पगार दिले नसले तरी रुग्णवाहिका चालकांमार्फत नियमितपणे आरोग्य सेवा दिली जात आहे. आजघडीला चालकांकडे घरुन कामावर येण्यासाठीही खिशात पैसे राहत नसल्याने उसणवारीही वाढली आहे.**

### एक चालक रुग्णालयात

**पगार नाही, मुलांचे शिक्षण, त्यापासून कौटुंबिक कलह अशा विविध त्रासाला दरदिवशी या चालकांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्यांनी मानसिक स्थितीही ढासळत असल्याचे दिसून येत आहे. तर याच धसक्याने एका चालकाची प्रकृती खालावली असल्याने सदर चालकावर रुग्णालयात उपचार सुरु असल्याचे संघटनेच्यावतीने सांगण्यात आले आहे.**

## संपादकीय

### भाजपावाल्यांनी घरच्या महिलांना मनुस्मृति वाचायला द्यावी!

घाण वाहून नेणाऱ्या गटारांना कधी पुर येत नसतो. कधी कधी ती तुंबतात. घाण मारतात. रोगराई पसरवतात. मात्र गटारांनाच गंगा समजून पूजणारे लोक समाजात तयार झाले, की सारा गाव धोक्यात येतो. सारा समाज बिमार होतो.

नद्या जीवनदायीनी असतात. पिण्याला पाणी देतात. शेतांना पाणी देतात. बागा फुलवतात. नद्या प्रवाही असतात. जिथून जिथून जातात, तिथलं जीवन समृद्ध करत जातात. असंख्य जीव नदीच्या आश्रयानं जगतात. वाढतात. घाणित वळवळणाऱ्या जंतुसाठी मात्र गटारनाली हाच स्वर्ग असतो.

भारतीय राजकारणात असल्या गटारजंतूना हल्ली थेट पूजनीय वगैरेचा दर्जा मिळाला आहे. सत्तेची नशा आहे. ठोक भावाने गोबरभक्त सम्प्रदाय मिळाला आहे. कोठ्यावर शोभतील असे जीव संसदेत किळसवाणा थयथयाट करूलागले आहेत. कमरेचं सोडून बेछूट आर–ोप करूलागले आहेत.

खरं तर पुर नद्यांना येतो. पण अलीकडे गटारांना पुर येण्याचे दिवस आहेत. लोक गटारांनाच नद्या समजायला लागले आहेत. काहीही झालं तरी गटाराचं पाणी पिण्यासाठी वापरता येत नाही. स्वयंपाकासाठी वापरता येत नाही. आंघोळीसाठी वापरता येत नाही. पण सामाजिक प्रदूषणच एवढं वाढलं की, पिढ्यानपिढ्या गटारगंगेत डुबकी मारणारे जीवजंतू हल्ली लोकांना पवित्र वगैरे वाटायला लागले आहेत.

मतिमंद विकृतांच्या संघटना जेव्हा समाजात राजरोसपणे मिरवायला लागतात, तेव्हा ती विनाशाची चाहूल असते. पर्यावरणाचे संतुलन बिघडले की एखादी नदी आपल्या मर्यादा विसरते. आपला रस्ता बदलते. थेट लोकांच्या वस्तीत घुसते. सारा गाव वाहून नेते. रस्ते खरडून नेते. जशी एखादी नदी बेभान होते, तसाच कधीकधी समाजही बेभान होतो. स्वताच्या मर्यादा विसरतो. विवेक विसरतो. आणि विकृतीची मालिका सुरूहोते.

असा भयानक पूर ओसरल्यावर घरात, दारात, अंगणात चिखल, सर्वत्र घाणीचा सडा पडलेला असतो. सारा गाव किळसवाणा होतो. किचनमध्ये, देव्हाऱ्यात सर्वत्र घाण.. आणि घाण ! २०२४ ला ही घाण साफ करण्याची शेवटची संधी आपल्याकडे आहे. तोवर आपण भानावर येतो की नाही, हा खरा सवाल आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ही घाण साफ करायला सुरुवात केली आहे. पण एकट्या न्यायालयाच्या भरवश्यावर विसंबून राहता येणार नाही. समाजाच्या चुका समाजानेच दुरुस्त केल्या पाहिजेत. माजी राज्यपाल आणि भाजपा नेते सत्यपाल मलिक यांनीही खुलेआम दंड थोपटले आहे. जिवावर उदार होऊन हे लोक देश आणि लोकशाही वाचविण्याच्या कामी लागलेले आहेत. आपलीही जबाबदारी मोठी आहे.

यादेशाचं संविधान बदललं पाहिजेय अशी स्पष्ट भूमिका प्रधान मंत्री मोदी यांचे आर्थिक सल्लागार असलेल्या विवेक देबराय या महाशयांनी जाहीरपणे मांडलेली आहे. ही गोष्ट साधी नाही. तो सरळ सरळ मोदींचा अजेंडा आहे. शहांचा अजेंडा आहे. तथाकथित योगी आदित्यनाथ बिष्ट यांचा अजेंडा आहे. संघाचा अजेंडा आहे. मनुस्मृति नव्हे, संघाला गोळवलकर यांचं `बंच ऑफ थॉट्स' देशाच्या माथी मारायचं आहे. शब्दशः मनुस्मृति लागू करणं हे तर भिड्याच्या–किड्याच्या बापालाही शक्य नाही, एवढी घाण त्या गटारात भरली आहे. हिम्मत असेल तर मनुस्मृतिच्या समर्थकांनी आपल्या आईला, बायकोला, बहिणीला, मुलीला, सुनेला ती घरात वाचायला द्यावी. किंवा आपापल्या कुटुंबातील व्यक्तीसमोर सामूहिक वाचन करावं! काही मोजक्या बिनडोक सोडल्या तर बहुसंख्य महिला अशा भिडे जंतूंना जोड्याने हाणल्याशिवाय राहणार नाहीत.

संघाला त्यांची हिंदुत्वाची नेमकी व्याख्या विचारली पाहिजे. खुद्द भागवतांना देखिल ती सांगता येणार नाही. मनास येईल ते बरळणं, हीच यांची फिलॉसॉफी. माना डोलवणारी बिनडोकांची फौज सोबतीला आहेच. भाजपा म्हणजे सफरचंदाच्या नावानं खपवली जाणारी सडक्या टमाटरची बास्केट! गोदी मीडियाचं मार्किटिंग आणि आमच्या सुशिक्षित समाजाचा मतलबी वेंधळेपणा यांच्या भरवश्यावर भाजपाची दुकानदारी सुरूआहे.

सडक्या टमाटरमधील काही अळ्या स्वतःला देशापेक्षा मोठ्या समजायला लागल्या आहेत. निवडणूक आयोगाच्या वळचणीला बसलेले काही भोंगूरही त्यांना सामील आहेत. सत्तेचा उन्माद या लोकांमधे ठासून भरलेला आहे. गृहमंत्री लोकसभेत सरळ सरळ खोटं बोलतो. प्रधानमंत्री टवाळी करतो, हे सारंच भयंकर आहे. अत्यंत टपोरी आहे. लाजिरवाणं आहे.

मणिपूर जळते आहे. हरयाणा जळतो आहे. महिलांची नग्न धिंड काढली जाते. बलात्कार होतात. कत्तल केली जाते. आणि आमचे स्वयं घोषित विश्वगुरु वर्ल्ड टूर करत आहेत. जराही संवेदना नाही. ही मानसिक विकृतीची परिसीमा आहे. भाजपा मधील महिला मंत्री, नेत्या, खासदार देखिल मुक्या झालेल्या आहेत. कोडगेपणा ठासून भरला आहे. एवढा मुर्दाडपणा कुठून आला असेल? कशामुळे आला असेल? उलट त्यांना संसदेमध्ये न दिलेला फ्लाइंग किस मात्र बोचला!

जनता हे सारं बघते आहे. उघड्या डोळ्यांनी बघते आहे. हळूहळू जागी होत आहे. राजकारणी सोडा पण इतर समाज देखिल जागा व्हायला सुरुवात झाली आहे. तोही संघटित होतो आहे. रस्त्यावर उतरण्याची तयारी करतो आहे. आपसात संवाद साधला जातो आहे. सभांतून व्यक्त होतो आहे. लढाईला सुरुवात झालेली आहे. सत्ताधाऱ्यांचा माज, त्यांचा पैसा, त्यांची दादागिरी, त्यांच्या धमक्या कशालाही आता तो घाबरेल असं दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या कळपातील लोक सुद्धा अस्वस्थ होत आहेत. हळूहळू भूमिका बदलण्याच्या मूड मध्ये आलेले आहेत. सामान्य माणूस हाच या महायुद्धाचा सेनापती असणार आहे!

**ज्ञानेश वाकुडकर**
**अध्यक्ष, लोकजागर अभियान, ९८२२२७८९८८**

## कुडवा येथे ढाब्यावरील २२ मद्यपींवर गुन्हा दाखल

**गोंदिया:** रामनगर पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या कुडवा येथील आंगण धाबा येथे विना परवानगीने दारु पिणे सुरु असताना राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी छापा मारुन २२ मद्यपींना दारुपितांना रंगेहात पकडले. ही कारवाई २० ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास करण्यात आली.

गोंदियाच्या बार असोसिएशनने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. आंगण ढाबा येथे विना–परवानगी दारु पित असल्याची माहिति राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाने पोलीस अधीक्षक डॉ. मनोहर अंचुळे यांच्या मार्गदर्शनात



निरीक्षक डी.बी.काळेल, दुय्यम निरीक्षक गायकवाड, सहाय्यक फौजदार तराटे, जवान डिब्बे, बन्सोड, वाहन चालक भोंडे यांनी सदर धाब्यावर छापामार कारवाई केली. यवेळी ढाब्यात बसून दारु पिणाऱ्या २ जणांना रंगेहात पकडण्यात आले. दरम्यान त्यांच्याकडून दारु, बियर, ग्लास, टेबल, खुर्ची आदि मुद्देमाल जप्त करण्यात आले. सर्व आरोपींच्या विरोधात महाराष्ट्र दारुबंदी कयदा १९४९ चे कलम ६८,८४ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता, चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

## गर्भ लिंग निदानास प्रतिबंध करुया ! मुलींच्या जन्माचे स्वागत करुया !

स्त्रीला अनंत काळजी माता म्हणून संबोधले जात असतांनाच याच स्त्रीला आज आपल्या जन्मासाठी आणि अस्तीत्वासाठी लढावे लागत आहे. स्त्री आणि पुरुष हे एकाच रथाची दोन चाके आहेत.या देशात जे महापुरुष होवून गेले, त्यांना जन्म देणारी आणि त्यांच्यावर संस्कार करणारी ही स्त्रीच आहे. "स्वामी तिन्ही जगाचा,आई विना भिकारी" अस स्त्रीच स्थान श्रेष्ठ असतांना अज्ञानापोटी स्त्रीचा जन्म नाकारण्याची जणू परंपरा समाजामध्ये वाढत आहे. ही बाब समाजासाठी अत्यंत चिंतेची आहे.

ज्या सोनोग्राफी सेंटरवर महिला सोनोग्राफी करण्यासाठी येतात. अशा सोनोग्राफी सेंटरच्या डॉक्टरांनी महिलांचे प्रबोधन केले पाहिजे. डॉक्टरांनीच सोनोग्राफी करणाऱ्या महिलेला व तिच्या नातेवाईकांना लिंग परिक्षण करणे कसे चुकीचे आहे हे समजावून सांगितले पाहिजे. त्यांना गर्भपाताचे धोके कसे आहे, हे पटवून सांगावे. स्त्री जन्माचे महत्व त्यांना पटवून दिले पाहिजे.

प्रसुतीपूर्व निदान तंत्राद्वारे गर्भधारणेपूर्वी किंवा नंतर जनुकीय विकृती किंवा गुणसुत्रातील विकृत जन्मत: व्यंग किंवा लिंग संबंधित विकृतीचे निदान व त्याच्या गर्भाच्या लिंग निवड व त्यानंतर स्त्री गर्भ भ्रुणहत्या अशा दुरपयोगास प्रतिबंध करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी समुचित प्राधिकरण व सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. सल्लागार समिती सदस्यांमध्ये स्त्री रोगतज्ञ बालरोग तज्ञ, क्ष–किरण तज्ञ व मेडिकल जेनेटिस्ट यापैकी एक तज्ञ, एक कायदा तज्ञ, जिल्हा माहिती अधिकारी,तीन सामाजिक कार्यकर्ते यामध्ये एकापेक्षा जास्त महिला संघटनेतील प्रतिनिधींचा समावेश आहे.

गर्भधारणापूर्वी व प्रसुतीपूर्व निदान तंत्राचा गर्भाचे लिंग निदान करुन व स्त्री गर्भ भ्रुणहत्येसाठी वापरास प्रतिबंध, प्रसुतीपुर्व निदान तंत्राचा उपयोग लिंग निदानासाठी करणाऱ्या जाहिरातीस प्रतिबंध, प्रसुतीपूर्व निदान तंत्राचा विशिष्ट जनुकीय व्यंग किंवा विकृती निदानासाठी वापर करण्यासाठी परवानगी व नियंत्रण अशा तंत्राच्या वापरासाठी नोंदणीकृत संस्थांनाच फक्त परवानगी या कायद्यानुसार देण्यात येते. कायद्यातील तरतुदीचा भंग केल्यास शिक्षेची तरतूद आहे.

सल्लागार समिती ही जनुकीय समुपदेशन केंद्र, जनुकीय प्रयोगशाळा, जनुकीय चिकित्सा केंद्र, सोनोग्राफी केंद्र यांना मान्यता देणे, बरखास्त करणे किंवा नोंदणी रद्द करणे,



सोनोग्राफी केंद्रासाठी प्रमाणित केलेल्या निकषांची अंमलबजावणी करणे, कायद्यातील नियमाच्या तरतुदीचा भंग होत असल्यास तक्रारींची दखल घेवून तपास करणे व त्वरीत कार्यवाही करणे, नोंदणी रद्द करण्यासाठी सल्लागार समितीचा सल्ला घेणे व त्यावर विचार करणे, लिंग निवड तंत्राचा व्यक्तीकडून कुठेही दूरूपयोग उपयोग होत असल्यास त्या व्यक्तीविरुध्द कायदेशीर कारवाई करणे, लिंग निदानासाठी वापराच्या प्रथेविरुध्द समाजात जागरुकता निर्माण करणे, कायदा व त्यातील नियमांच्या अंमलबजावणीवर देखरेख करणे, नियमातील तांत्रिक किंवा सामाजिक अटीबाबत सुधारणा असल्यास त्याबाबत केंद्रीय बोर्ड किंवा राज्य बोर्डाकडे शिफारस करणे, सल्लागार समितीने केलेल्या शिफारसीवर कार्यवाही करणे, समुचित प्राधिकरण पुर्ण चौकशी करुन व अर्जदाराने नियमातंर्गत अटी पुर्ण केल्याबद्दल समाधानी झाल्यावर व सल्लागार समितीच्या सल्लूयाप्रमाणे स्वतंत्रपणे किंवा संयुक्तरीत्या जनुकीय समुपदेशन केंद्र, प्रयोगशाळा व सोनोग्राफी केंद्रांना नोंदणी प्रमाणपत्र देवू शकते. चौकशीअंती अर्जदारास त्यांचे म्हणणे सांगण्याची संधी दिल्यावर व सल्लागार समितीच्या सल्लूयाचा आदर राखून अर्जदाराने कायद्यानुसार आवश्यक अटीचे पालन न केल्याचे वाटले तर त्या कायद्याचा लेखी उल्लेख करुन समुचित प्राधिकरण अर्ज नामंजूर करु शकते. संयुक्तीक कारण देवून समुचित प्राधिकरण स्वत: किंवा तक्रारीच्या आधारे त्या केंद्राचे नोंदणी प्रमाणपत्र का रद्द करण्यात येवू नये अशी विचारणा कारणे दाखवा नोटीसद्वारे करु शकते. केंद्राचे म्हणणे ऐकूण घेण्यासाठी पुरेशी संधी दिल्यावर व सल्लागार समितीच्या सल्लूयानुसार केंद्राने कायद्यातील तरतुदीचा भंग केल्याबाबत समाधानी असेल तर पुर्वग्रह न बाळगता अशा– केंद्राचे नोंदणी प्रमाणपत्र विशिष्ट कालावधीसाठी किंवा पुर्णपणे रद्द करु शकते.

समुचित प्राधिकरण सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कारणांचा लेखी निर्देश करुन कोणतीही पूर्वसूचना न देता केंद्राचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करु शकते. या कायद्याचा भंग झाल्यास त्या व्यक्तीस तीन वर्षाचा कारावास व १० हजार रुपयापर्यंतच्या दंडास पात्र ठरतो. प्राधिकरण रजिस्टर मेडिकल प्रॅक्टीक्शनरचे नांव स्टेट मेडिकल कौन्सीलला नोंदणीपत्र रद्द करण्यासाठी कळवते.जर आरोप सिध्द झाला असेल तर कौन्सीलच्या रजिस्टरमधून पाच वर्षाकरीता पहिल्या गुन्हयासाठी व पुढील गुन्हयासाठी कायमस्वरुपी नांव काढण्यात येते. जर एखादी व्यक्ती गरोदर स्त्रीवर लिंग निवडीसाठी प्रसवपूर्व निदान तंत्राची मदत घेत असेल तर ती व्यक्ती तीन वर्षापर्यंत कारावासास व ५० हजार रुपये तंत्राची पहिल्या गुन्हयासाठी व पाच वर्षापर्यत कारावासास व १ लाख रुपयांपर्यत दंडास पुढील गुन्हयासाठी पात्र ठरते.या अधिनियमातील प्रत्येक गुन्हा दखलपात्र, अजामीनपात्र व नॉन कंपाउंडेबल असेल. संबंधित समुचित प्राधिकरण केंद्र किंवा राज्य शासनाने असे अधिकार दिलेला अधिकारी यांनी तक्रार केल्याशिवाय अशा गुन्हयाची दखल कोणतेही कोर्ट घेत नाही. महानगर दंडाधिकारी किंवा वर्ग १ चे न्यायदंडाधिकाऱ्याशिवाय इतर कोणत्याही न्यायालयात अशा गुन्हयाबाबत खटला चालविला जात नाही. एखादी व्यक्ती किमान १५ दिवस मुदत घेवून गुन्हयाबाबत प्राधिकरणास त्याच्या अखत्यारीतील संबंधित नोंदीच्या प्रती सादर करण्यास न्यायालय आदेश देवू शकते. नोंदणीकृत केंद्राने आपल्या केंद्राचे रेकॉर्डस्, रिपोटर्स, संमतीपत्रे, प्रमाणित केलेले सर्व रेकॉर्डस् दोन वर्षापर्यत जपून ठेवावे लागतात. केंद्राविरुध्द गुन्हेगारी स्वरुपाचे किंवा इतर खटले दाखल केलेले असतील तर अशा केंद्रातील सर्व नोंदी संबंधित कागदपत्रे खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत जपून ठेवावी लागतात.

गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित २००३ चे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती/ केंद्र/ संस्था व तसेच या कायद्यातील कलम २२ नुसार जाहिराती करणाऱ्या व्यक्ती/ पुस्तके/प्रकाशक/संपादक/ वितरक इत्यादींची माहिती समुचित प्राधिकाऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. अशी माहिती संबंधित समुचित प्राधिकाऱ्यांना प्रथमत: देणाऱ्या व्यक्तीस त्याने दिलेल्या बातमीची/ माहितीची समूचित प्राधिकरयामार्फत खातरजमा करून संबंधित सोनोग्राफी केंद्रावर/ व्यक्तीवर न्यायालयीन प्रकरण दाखल केल्यावर संबंधित व्यक्तीस १ लाख रुपये इतकी रक्कम बक्षीस म्हणून देण्यात येते.

बेकायदेशीरपणे लिंगनिदान व गर्भपात होत असल्यास हेल्पलाइन क्रमांक १८००२३३४४७५ तसेच www.amchimulgi.gov.in या संकेतस्थळावर देखील तक्रार नोंदविता येते. राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाचा मुख्य उद्देश लोकसंख्या नियंत्रण हा आहे. यामागे सर्वांगीण विकास करुन स्त्री–पुरुष प्रमाण समतोल करणे हा देखील एक उद्देश आहे. प्रसवपूर्व निदान तंत्र कायद्यात २००२ मध्ये दुरुस्ती होवून हा कायदा १४ फेब्रुवारी २००३ पासून अस्तित्वात आला. याला गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा असे नांव देण्यात आले आहे. गर्भलिंग निदान तंत्राचा दुरुपयोग होवून, गर्भलिंग निदान करुन मुलीचा गर्भ असल्यास तो नाहीसा केला जातो.या प्रकाराला आळा बसावा व त्याद्वारे समाजातील स्त्री–पुरुष प्रमाणातील असमतोल दूर व्हावा,हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

**विवेक खडसे**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**वाशिम**

## आरएसएसची विचारधारा थोपविण्याचा अट्टहास का?

### गडचिरोलीच्या आदिवासी युवकांचा सवाल !

गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठाच्या संदर्भात अखेर आदिवासी युवकांच्या संयमाचा बांध फुटला. शनिवारी दि. १९ ऑगस्ट रोजी परत पंडित दीनदयाळ उपाध्याय अध्यासनाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम विद्यापिठात ठेवला होता. त्यावेळी गडचिरोली येथील आदिवासी युवकांनी दीनदयाळ उपाध्याय अध्यासनाच्या विरोधात जोरदार आंदोलन केले. "विद्यापीठ आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे' तसेच "दीनदयाळ उपाध्याय अध्यासन रद्द झालेच पाहिजे' अशा घोषणा देण्यात आल्या.

काही महिन्यांपूर्वी विद्यापीठाने एका सभागृहाला अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे संस्थापक दत्ताजी डीडोळकर यांच्या नावाचा प्रस्ताव मंजूर करुन ते नाव देण्याचा प्रयत्न केला. पण जागरुक नागरिकांनी तो प्रयत्न उधळून लावला होता. डीडोळकर यांचा गडचिरोली आणि गोंडवना विद्यापीठाशी काय संबंध असा प्रश्न आंदोलकांनी विचारला आणि विद्यापीठाला त्याचे उत्तर देता आले नाही. श्री. वसंतराव कुलसंगे यांनी विद्यापीठासमोर आमरण उपोषण सुरू केले आणि लागलीच कुलगुरूंनी माघार घेऊन तो निर्णय रद्द केल्याचे सांगत उपोषण सोडण्याची विनंती कुलसंगे यांना केली होती.

आता एक एकात्म मानववाद नावाचे अध्यासन सुरू करुन त्याला पंडित दीनदयाळ उपाध्याय असे नाव दिले आहे. त्याचा उद्घाटन समारंभ शनिवारी होता. त्यापूर्वीच गडचिरोली येथील आदिवासी युवा विकास परिषदेच्या कार्यकर्त्यांनी पत्रपरिषद घेऊन तो समारंभ उधळून लावण्याचा इशारा दिला होता. या अध्यासनाच्या माध्मातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपली विचारधारा बळजबरीने थोपविण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप केला आहे. गुलाब मडावी, विनोद मडावी, जगदीश मडावी, माधुरी मडावी, सचिन भलावी, राज बनसोड आणि वसंत कुलसंगे यांनी केला होता. त्यांनी आपल्या निवेदनातून म्हटले आहे की दीनदयाळ उपाध्याय यांचा शिक्षण क्षेत्राचा कोणताही संबंध नाही. भाजप संघाची विचारसरणी विद्यापीठाच्या द्वारा थोपवू पाहत आहे.

हे एकंदर प्रकरण पाहता असा प्रश्न पडतो की गोंडवाना विद्यापीठात आरएसएसशी संबंधित व्यक्तींच्या नावाचा आग्रह का केला जात आहे. डीडोळकर किंवा जनसंघाचे दीनदयाळ उपाध्याय यांचा तसा आदिवासीबहुल विभागात स्थापन केलेल्या गोंडवाना विद्यापीठाशी काही संबंध नाही. या उलट गेल्या अनेक वर्षांपासून या विद्यापीठात आदिवासी अध्यासन व्हावे यासाठी आदिवासी अभ्यासकांनी मोहीम राबविली आहे. पण मागणी मंजूर केली गेली नाही. अठराशे सत्तावनच्या उठावात आणि त्यापूर्वीही अनेक आदिवासी योद्ध्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात लढा दिला आहे. त्यांच्या नावाने अध्यासन करावे किंवा सभागृहाला नाव द्यावे अशाही मागण्या झाल्या आहेत. पण २०१४ पासून देशात झालेल्या सत्तापरिवर्तनानंतर त्या मागण्यांची दखलच घेतली गेली नाही. राज्याचे सरकार असो की विद्यापीठातील नियुक्त्या असोत महाराष्ट्राच्या राज्यपालांनी आजवर कोणती भूमिका घेतली हे सर्वश्रुतच आहे.

मुळात गडचिरोली सारख्या आदिवासीबहुल प्रदेशात विद्यापीठाची निर्मिती करताना स्थानिक प्रश्न जसे प्राधान्याने लक्षात घेतले जातात तसेच, स्थानिक संसाधनांचाही विचार केला जातो. जसे भौतिक संसाधने असतात तसेच एखाद्या प्रदेशाचा इतिहास आणि भूगोलही महत्त्वाचा असतो. स्थानिक सांस्कृतिक संसाधनाच्या आधारे विकास करण्याचा आणि बेरोजगारीच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न या विद्यापीठाकडून अपेक्षित होते. पण तसे काहीही करण्यात आले नाही. समृद्ध अशी गोंडी संस्कृती जगात प्रसिद्ध आहे. झाडीपट्टीतील रंगभूमी वैशिष्ट्यपूर्ण आहे. पण या संदर्भात विद्यापीठाने काहीही केलेले नाही. आदिवासींच्या सांस्कृतिक विकासासाठी स्वतंत्र अध्यासनाची मागणीही पूर्ण केलेली नाही. झडीपट्टी रंगभूमीच्या विकासासाठी एक केंद्र निर्माण व्हावे अशी मागणी झाली होती. विद्यापीठाने एक बैठक बोलवली होती. त्या बैठकीचे मलाही निमंत्रण दिले होते. मी त्यावर सविस्तर अहवाल विद्यापीठाला दिला होता. पण त्याचे पुढे काहीच झाले नाही. मात्र स्थानिक लोकांची मागणी नसतानाही डीडोळकर किंवा दीनदयाळ उपाध्याय यांच्या नावाने उपक्रम सूरू करण्याचा धडाका मात्र विद्यापीठाने लावला आहे. त्यामुळे गोंडवाना विद्यापीठ कुणासाठी व कशासाठी स्थापन केले असे प्रश्न निर्माण होतात.

**-प्रमोद मुनघाटे**

## मधु पुराण

शहद मधु वा मध म्हणून ओळखल्या जाणऱ्या भूतलावरील अमृताची व मानवाची फार जुनी मैत्री आहे.वैदिक काळापासून ते आजपावतो हिंदु–जीवनातील सोळा संस्कारापैकी "जातकर्म' नावाच्या पहिल्या संस्काराची सुरुवातच मुळी मधापासून होते. मूल जन्मल्याबरोबरच त्याला सोन्याच्या अंगठीने मध पाजल्यामुळे भावी जीवनात ते तेजस्वी व कर्तबगार होते, हा वेदात सांगितलेला संस्कार आजही हिंदु लोक मोठ्या श्रद्धेने "नवजात'शिशुवर करतात.भारताची देणगी समजल्या जाण?या ङ्गआयुर्वेदातफतर मधाला अमृताचा उपमा दिल्या गेली आहे.आयुर्वेदात मध औषधी, सौंदर्य प्रसाधनातील मुख्य घटक तसेच आध्यात्मिक शक्ती पुरविणारे भांडार म्हणून उपयोगात आणले जाते.त्याचप्रमाणे बऱ्याच आयुर्वेदिक औषधांसाठी "अनूपात'म्हणूनही मधाचा वापर होत असतो. अशा ह्या अमृतरुपी व नवचैतन्य देणाऱ्या पदार्थाची महती भारताप्रमाणे जगातही आजतागायत अबाधित आहे.

जुन्या–करारातील(old testament),एका उल्लेखप्रमाणे यहुदी लोक जेव्हा केनन,ज्युडा,पॅलेनस्टाईल येथे स्थिरावल्यावर ते उत्कृष्ट गोपालक असल्याने दूध–दुभतेविपुल प्रमाणात होती,त्यातच मध मोठ्या प्रमाणातमिळत असल्याने ते ह्या प्रदेशाला "स्वर्ग–भूमी' संबोधित असे.प्राचीनमिस्त्र ( इजिप्त)व फारस देशात थडग्यात पुरल्या जाणाऱ्या किंवा पशुपक्ष्यांसाठी खाद्य म्हणून भेट दिल्या जाणाऱ्या मृत देहांवर, तो बऱ्याच काळ राहण्यासाठी त्यावर मधाचा लेप लावण्यात येत असे. इजिप्त मधील फरोच्या थडग्यात ठेवलेले ३००० हजार वर्षापुर्वीचे मध शास्त्रज्ञांना आजही जसेच्या – तसे दिसून आले, कारण मधाच्या हाय–कॉन्संट्रेशन मुळे त्यात कोणताही बॅक्ट्रीया वा सुक्ष्म–माक्रोब संसर्ग करु शकत नाही, हे प्राचीन मिस्त्रवासीयांना माहीत होते. त्याचप्रमाणे पुरातन ग्रीकोरोमन संस्कृतीत मधापासून रंग व सौंदर्य–प्रसाधने तयार करण्याचे उल्लेख आढळतात तर कुराणातील एकाउल्लेखाप्रमाणे मोहमद–पैगंबर साहेब (मो.सल.) ह्यांनामध अत्यंतप्रिय होते. तर "इस्लाम 'कुबूल करण्याअगोदरच्या प्राचीन इराकी संस्कृतीत नव–दांपत्य पहिल्याच रात्री एकमेकांना मोठ्या प्रेमाने, मधाळ–भाषेत "मधु–मधु' (अर्थात इराकी भाषेत) संबोधित असत. ह्यामुळे कदाचित नवदांपत्य वैवाहिक जीवनाचा पहिल्याच रात्रीचा मधु, चंद्राच्या साक्षीने चाखण्याकरीता त्या पहिल्याच रात्रीला "मधु–चंद्र' म्हणत असावे. आजही जगात अशा बऱ्याच रानटी जमाती आहेत ,ज्या मध व मधमाशीची पूजा करतात.मानवाला प्राचीन काळापासुनच मध व मधमाशांव्दारे मधनिर्मिती ह्याबाबत कमालीचीजिज्ञासा होती. आज जरी कृत्रीम पद्धतीने मधनिर्मिती करण्याविषयी संशोधन सुरु आहे, तरीही मधमाशांशिवाय मध ही कल्पनाच करु शकत नाही,त यामुळेच मधमाशा व मधनिर्मिती प्रक्रिया ह्या विषयी कुतुहल निर्माण होणे साहजिकच ठरते.

### "मधमाशांचा जीवनक्रम व मधुशोधन"

व्यावहारिक दृष्ट्या अविरत व अत्यंत कष्ट करण्याऱ्या मनुष्याला आपण मुंगी किंवा मधमाशीची उपमा देतो. ह्यावरुनच कष्ट, चिकाटी वतिच्या कार्याची सिद्धता होते. मधुमक्षिका पालन केंद्रातील तज्ञानूसार एक किलोग्रम मध तयार करण्याकरिता एका मधमाशीला पृथ्वीच्या सहा–विषववृतिय फेऱ्या एवढे अंतर कापावे लागते. ह्यावरुनच मधमाशीच्या कष्टाची व प्रयत्नांची कल्पना येऊ शकते.मधमाशा ह्या मुंगीकिंवा वाळवी (उधई) ह्याकिटक–प्राण्यांप्रमाणेच समाज स्थापन करुन राहणारे सामाजिक जीव असतात. ह्यामुळेच मधमाशांचे पोळे म्हणजे अत्यंत शिस्तबद्ध व पद्धतशीर स्थापन केलेल्या छोट्या–छोट्या कप्प्यांच्या घरांची जवळपास एक कॉलनीच असते. पोळ्यात प्रत्येक जीवांची दिनचर्या व कामाचे वाटप ठरलेले असते. नर व मादी ह्यांच्याकडे प्रजोत्पादनाचे काम असते तर सैनिक व कामकरी मधमाशांकडे अन्न, संरक्षण तसेच अंडे व सुरवंट ह्यांची निगा राखण्याचे महत्वपुर्ण काम असते. लैंगिक दृष्ट्या कामकरी माशा नंपुसक असतात.

प्रत्येक पोळ्यात केवळ एकच राणी असून ती आकाराने नरापेक्षा तसेच इतर सर्वानापेक्षांही बरीच मोठी असून केवळ प्रजोत्पादन हेच तिचे जीवनकार्य असते. प्रत्यक्ष मकरंद वा पुष्पसुधा शोधण्याचे व त्यापासून मध तयार करण्याचे अत्यंत कष्ट्दायक काम हे कामकरी माशांकडे असल्याने मकरंदाचा शोध घेण्यासाठी ह्या मधमाशांना जवळपास ८ ते १० मैलांपर्यत भटकंती करावी लागते आणि एकदाचा मकरंदाचा साठा त्यांना



आढळला कि त्यांच्या आनंदाला पारावर राहात नाही. मग ही मधाळ व गोड बातमी इतरांना सांगण्यासाठी मग सर्व कामकरी माशा परत आपल्या पोळ्याजवळ येतात, पण पोळ्याकडे परत येतांना ह्या मधमाशा विशिष्ट नृत्य करित, गिरक्या घेत तसेच पंखांच्या विशिष्ट हालचाली करित येत असतात. ह्या सर्व क्रिया व संकेतांना एक अर्थ असतो हे अलिकडच्या संशोधनाने सिद्ध झालेले आहे. कारण मधमाशांच्या ह्याच संकेतावरुन मकरंदयुक्त फुले व साठा मुख्य पोळ्यापासूनकिती अतंरावर आहे व साठा किती प्रमाणात आहे, इत्यादी विषयक माहिती पोळ्यातील इतर माशांना मिळते. जर हा साठा व फुले ९० ते १०० मिटरच्या टप्प्यात असतील तर शोध घेणा?या माशा "गोलाकार' नृत्य करित पोळ्याकडे परत येतात जर हाच साठा १०० मिटरपेक्षा जास्त अंतरावर असेल तर येणाऱ्या माशा ८ च्या आकड्यात फेर धरित, गिरक्या घेत येतात. त्यामुळेच मकरंद साठ्याचे अंतर , मार्ग व साठ्याचे प्रमाण इतर माशांना कळते हे सिद्ध झाले आहे.

### "मधनिर्मितीकशी होते'

मधमाशांच्या शोध पथकाद्वारे एकदा का मकरंद साठ्याचीनिश्चितीझाली की मग पुढील कार्याला सुरुवात होते. मकरंद साठ्याची बातमी हां–हां म्हणता संपूर्ण पोळ्याला समजते व त्याच बरोबर मधमाशांची एक मोठी पलटण सज्ज होवून पेंढाऱ्यांच्या धाडीप्रमाणे पोळयातून कामकरी मधमाशा एखादया झंझावात्या प्रमाणे साठ्याकडे रवाना होतात. मग कामकरी माशा आपल्या नलिकायुक्त जीभेद्वारे फुलांतून "पुष्पसुधा' खूडण्याचे काम सुरु करतात. मकरंद प्रत्येक माशा आपल्या पोटात जमा करतात पण मकरंदा बरोबर फुलांतील "पराग–कण'ही मधमाशांच्या शरीराला चिटकते व ह्याच माशा जेव्हा दुसऱ्या फुलांवर बसताततेव्हा निसर्गातील एक महत्वाची जीवशास्त्रीय क्रिया अर्थात (pollination) "पराग–सिंचन'घडून येते, मग त्याव्दारे फलन–क्रियेचामार्ग मोकळा होऊन अन्ननिर्मिती होते अर्थात ह्यासाठीच देवतुल्य अशा निसर्गाने फुलात मकरंद व सृष्टीत किटकांची निर्मिती केली असावी बरे असो, आता पोटात जमा झालेला मधुरस घेऊन ह्या कामकरी माश्या परत पोळ्यात येतात व आपल्या पोटतील मधुरस इतर स्थानीक माशांकडे प्रसारित करतात ह्या पोळ्यातील मधमाश्या आलेल्या मधुरसात स्वत:च्या तोंडातील पाचक–रस व लाळ मिसळवून मध बनविण्याच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात होते. ह्या टप्प्यात मधमाश्यांच्या लाळेतील विशिष्टविकरांमुळे (enzymes) मधुरसातील शर्करेचे "ग्लुकोज व फ्रुक्टोज'मध्ये रुपांतर होऊन पहिला टप्पा पुर्ण होतो.त्या नंतरच्या टप्प्यात मधु–रसातील पाण्याचे प्रमाण कमी करण्याचे काम काही निवासी कामकरी मधुमाश्या आपल्या चिमुकल्या पंखांव्दारे (पंख्याप्रमाणे कार्य करित) अहोरात्र करत राहतात. त्याव्दारेच पहिल्या टप्प्यातील मधुरस आता जास्तच घट्ट होऊ लागतो व त्यानंतर ३ ते ४ दिवसांनी पोळ्यांच्या प्रत्येक कप्प्यातपुर्ण तयार झालेला मध दिसून येतो.

### "मध व पोळ्याचे –संरक्षण'

"जीवन जगण्याची धडपड'ह्या सहज–प्रवृत्ती नूसार स्वसंरक्षण ही प्रत्येक जीवाची प्रवृत्ती असते. त्यामुळेच आपल्या पोळ्याचे व त्यात असणाऱ्या अंडे, सुरवंट व मधाचे संरक्षण करण्याच्या कामातही मधमाशा अत्यंततत्पर व कार्यदक्ष असतात. कामाच्या वाटपानूसार हे काम सैनिकी (कामकरी) मधमाशांकडे असते. मधमाशांना आपले मध व पोळे अत्यंत प्रिय असते, त्यामुळेच मध व पोळ्याकडे इतर कोणत्याही जीवांनी जिभल्या चाटत जाण्याचा थोडाही प्रयत्न केला तर ते त्याला सोडत नाही. मग प्रत्यक्ष अनंत कोटी ब्रह्मांड नायक देव कां असेना, त्याच्यावरही हल्ला करण्यास मधमाशा मागेपुढे पाहात नाही. मधमाशांनी प्रत्यक्ष "गजानन महाराजा' वर हल्ला करुन,चावे घेऊन त्यांच्या शरीरात काटे रुतविल्याचे वर्णन "श्री गजानन–विजय'ह्या दासगणुविरचीतग्रंथात आढळून येते. माणसाप्रमाणे किटक, मुंग्या, अस्वल ह्यांनाही मध फार आवडते व ते मध मिळविण्याच्या प्रयत्नात कित्येकदा सैनिकी मधमाशांकडून मार खाऊन जातात, कारण पोळ्याच्या आजुबाजुच्या क्षेत्रात जराही धोक्याची सुचना मिळाली की मधमाशा त्वरित सतर्क होऊन ,आक्रमण करुन, आपल्या विषारीनांगीने चावे घेऊन आक्रमितांना जबर अद्दल घडवित आपल्या मध व पोळ्याचे रक्षण करतात. पण बरेच वेळा मनुष्यांच्या क्लुप्तांसमोर व अंगावर दाट केस असणाऱ्या अस्वलीसमोर मधमाशांना आपली नांगी टाकावी लागते, अशा वेळेस मधमाशा स्वत:च थोडाफार मध प्राशन करुन, उरलेला मध त्या मधमाशा आक्रमणकाऱ्यांच्या स्वाधीन मोठ्या नाईलाजाने करतात.मोठ्या प्राण्यांप्रमाणे बॅक्टेरिया व विषाणु (viruses) सारखे सुक्ष्मजीवही मध व पोळ्यांवर हल्ले करित असतात पण मधाच्या उच्च संहितेमुळे व ऑसमॉटिक–प्रेशर ह्या भौतिकी प्रॉपर्टी मुळे मधाचे आपोआप संरक्षण होत असते.

### "मधातील घटकद्रव्ये व पोळ्यातील बायप्रॉडक्स"

मधात शर्करेची दोन रुपे,ग्लुकोज व फ्रुक्टोज प्रामुख्याने आढळून येतात पण त्याचबरोबर मधात ङ्गसीफव ङ्गबी–जीवनसत्वेही आढळूनयेतात.त्याचप्रमाणेसोडियम , पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह,तांबे, मॅगनिझ ही खनिजेही मधात आढळून येत असल्याने,ऊस शर्करा वा बीट शर्करेपेक्षाही मध हे किती तरी आरोग्यवर्धक व मुल्यवान समजले जाते.मधाबरोबरच पोळ्यात आणखी ही दोन बायप्रॉडक्स अर्थात उपउत्पादने दिसून येतात. ते म्हणजे मेण जे प्रत्यक्ष पोळ्यापासून मिळते तर दुसरे म्हणजे "रॉयल–जेली'हा दुधासारखा पांढरा शुभ्र व चिकट द्रवपदार्थ असून ह्याचा उपभोग केवळ पोळ्याची–राणीच जन्मभर घेत असल्याने ह्याला रॉयल जेली किंवा राणीचे पेय म्हणतात. अर्थात पोळ्यातील सुरवंटाना काही काळपर्यंत ह्याचा स्वाद घेण्याची मुभा असते.पण मधाची सर ह्यापैकी कोणात्याहीउपउत्पादनाला नसते. त्यामुळेच उपउत्पादन नव्हे तर मधावरुनच मधमाशांची ओळख ठरते. अशा ह्या आरोग्यवर्धक व आध्यात्मिक शक्तीचे भांडार असणाऱ्या ह्या मधावर आयुष्य कंठीत करणारे योगी व साधुप्रवृतीच्या महामानवाची बरीच उदाहरणे, प्राचीन काळापासून दिसून येतात पण आधुनिक काळातविनोबाभावे, महात्मा गांधी, मोरारजी देसाई सारख्या विभूती नित्य मधुसेवन करीत व आयुष्याच्या अखेर पर्यत अत्यंत कार्यक्षम व दीर्घायुषी जीवन जगल्यात, त्या केवळ मधातील आध्यात्मिक व शारिरीक शक्तीच्या जोरावरच व त्यामुळेच कदाचित प्राचीन काळापासून मधाला अमृताची उपमा दिल्या गेली असावी ह्यात संशय नाही.

**संकलन**
**प्रा.डॉ.एस.बी. धन्नासरे**
**गोंदिया–९९२११३४७८०**

# जिल्ह्यातील सर्व शाळांतून होणार संविधानाचा गजर

## जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंजि. यशवंत गणवीर यांचा निर्णय : शिक्षण समितीच्या सभेत ठराव पारित

**गोंदिया :-** विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटनेची माहिती व्हावी, तथा भविष्यातील एक सक्षम नागरीक तयार व्हावा, यासाठी जिल्ह्यातील सर्वच शाळांमध्ये संविधानाच्या अभ्यासावर भर देण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणवीर यांनी (ता. १८) पार पडलेल्या शिक्षण समितीच्या सभेत दिले. त्याला शिक्षण समितीने एकमताने मंजूरी दिली असून जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांसह सर्व शासकीय, निमशासकीय तथा खासगी शाळांमध्ये आता संविधानाचा गजर होणार आहे.

भारतीय संविधान हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे. संविधानातून मुलभूत अधिकारासह मुलभूत कर्तव्य देखील सांगितले आहे. देशातील प्रत्येक व्यक्तीचा विकास, त्याचे स्वांतत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण भारतीय राज्यघटना देते. त्यामुळे शालेय जीवनापासून संविधानाच्या अभ्यासावर शिक्षकांसह विद्यार्थ्यांचा भर असायला हवा, असे मत जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष यशवंत गणवीर यांनी शिक्षण समितीच्या सभेत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, शिक्षकांनी दररोज संविधानाच्या तीन कलमांचे फळयावर लेखन करुन विद्यार्थ्यांकडून ते पाठांतर करुन घ्यावे. विद्यार्थ्यांकडून त्यासाठी एक स्वतंत्र वही करावी. संविधानातील कलमांची त्यात नोंद करावी. इयत्ता पाचवी ते १२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा यात समावेश करण्यात यावा. मात्र, इयत्ता ८ ते १२ च्या विद्यार्थ्यांकडून प्राथमिकतेने शिक्षकांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेसह ३ कलमांचे प्रतिदिन लेखन करुन



घ्यावे. त्या कलमा मुखोद्गत होतील याकडे लक्ष द्यावे.

दरम्यान संविधानाच्या संबधाने विद्यार्थ्यांची प्रत्येक महिन्याला परिक्षा घ्यावी. या परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तथा प्रोत्साहनपर परितोषिक सुध्दा द्यावे. संविधान प्रत्येक शाळांमध्ये असायला हावा. तथा त्याची व्यापकता व सर्वसमावेशकता लक्षात घेता तो प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोचविण्याचे कार्य शिक्षकांनी करावे. असे आवाहनही जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मा. इंजि. यशवंत गण–वीर यांनी केले.

दरम्यान विविध क्षेत्रातील शालेय समस्यांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. शिक्षकांची कमतरता असलेल्या शाळांमध्ये पर्यायी व्यवस्था करण्याचे देखील निर्देश या बैठकीत देण्यात आले. बैठकीत शिक्षण समितीचे सदस्य तथा जिल्हा परिषद सदस्य नेहा केतन तुरकर, अंजली गुलशन अटरे, लक्ष्मी रविशंकर तरोणे, विमल बबलू कटरे, शैलेश तुळशीराम नंदेश्वर, सशेंद्र खेमचंद भगत, तुमेश्वरी लिलाधर बघेले, निशा शुभम जनबंधू, प्राथमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी अनिल चव्हाण, देवरीचे गटशिक्षणाधिकारी महेंद्र मोटधरे, सालेकसा गटशिक्षणाधिकारी विशाल डोंगरे, आमगाव गटशिक्षणाधिकारी कुसुम पुसाम, गोरेगाव गटशिक्षणाधिकारी एन.जे. सिरसाटे, सडक अर्जुनी गटशिक्षणाधिकारी एस. आर. बागडे, गोंदियाचे शिक्षण विस्तार अधिकारी पी.पी. समरीत, तिरोडा शिक्षण विस्तार अधिकारी ये.एस. बरईकर, अर्जुनी मोरगाव शिक्षण विस्तार अधिकारी बी. डब्ल्यू भानारकर उपस्थित होते.

# अर्जुनी मोर. तालुक्यात परीक्षा उत्तीर्ण बारा कोतवालांना नियुक्तीपत्र वितरण



**अर्जुनी मोरगाव:–** तालुक्यात १३ ऑगस्ट रोजी कोतवाल पदाकरिता परीक्षा घेण्यात आली. व त्याच दिवशी निकाल जाहीर करण्यात आला. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तालुक्यातील बारा कोतवालांना तारीख १८ ऑगस्टला तहसील कार्यालय येथे तहसीलदार अनिरुद्ध कांबळे यांचे हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

सन २०१७ पासून रेंगाळलेली कोतवाल भरती परीक्षा अनेक कारणाने गाजली. यावर्षी अर्जुनी मोरगाव उपविभागातील सडक /अर्जुनी चार जागा व अर्जुनी मोरगाव तालुका १२ कोतवाल असे एकूण १७ जागांसाठी लेखी परीक्षा ३० जुलै रोजी घेण्यात आली होती. यामध्ये सडक अर्जुनी तालुक्यातील चार जागांसाठी ८३ उमेदवार तर अर्जुनी मोरगाव तालुक्यातील बारा जागांसाठी ३९४ उमेदवारांनी परीक्षा दिली होती. मात्र कोतवाल भरती परीक्षेत घोळ झाल्याचा आरोप करीत परीक्षार्थ्यांनी आंदोलन व उपोषण केले होते. त्यानंतर जिल्हाधिकारी यांचे सूचनेनुसार उपविभागीय अधिकारी वरुण शहारे यांनी ही परीक्षाच रद्द केली होती. त्यानंतर १३ ऑगस्ट रोजी सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सोळा कोतवाल पदासाठी सरस्वती विद्यालयातील एकाच केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरेच्या देखरेखी खाली व पोलीस बंदोबस्तात परीक्षा घेण्यात आली व त्याच दिवशी निकाल जाहीर करण्यात आला. व तारीख १८ ऑगस्टला अर्जुनी मोरगाव तालुक्यातील कोतवाल परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या १२ उमेदवारांना तहसीलदार अनिरुद्ध कांबळे यांचे हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यामध्ये पवनी धाबे साजा क्रमांक २७ दीपक राऊत, पांढरवाडी माल.४ यशवंत कोरे, माहूरकुडा १८ गुलशन कापगते, चिचोली २२ अतुल काटेंगे, शिलेझरी १३ ऋषभ कोरे, धाबेटेकडी /आदर्श त्रोषीक लंजे, नवेगाव बांध ५ सुनील सांगोलकर, अर्जुनी ९ रीना परिहार, ईटखेडा १७ विद्या मेहंदळे, भरणोली २५ खोमेस ताराम, खामखुरा १९ भाग्यश्री आकरे, गोठणगाव २६ वर्षा बोरकर यांना नियुक्ती पत्र देण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार अनिरुद्ध कांबळे यांनी दिली. यावेळी नायब तहसीलदार जी.एस.सोनवाणे, एम. के. क्षीरसागर तथा कर्मचारी रूपचंद नाकाडे, आशिष रामटेके व अन्य कर्मचारी उपस्थित होते.

अर्जुनी मोरगाव तालुक्यात एकूण २१ कोतवाल पदाच्या जागा रिक्त होत्या. त्यामध्ये शासनाच्या ८०% कोतवाल भरती कपात निर्णयाने १७ जागा भरण्याचे निश्चित झाले. तसे आरक्षण सुद्धा काढण्यात आले होते. त्यातही चार जागांसाठी अर्जच आले नसल्याने १३ जागांसाठी परीक्षा निश्चित करण्यात आली होती. त्यातही देवलगाव येथे आर्थिक दुर्बल घटकासाठी आरक्षण होते मात्र यामध्ये संबंधितांनी अर्जच केला नाही. केवळ अनुसूचित जातीच्या महिला उमेदवाराने अर्ज केला. त्यामुळे या गावची परीक्षा घेण्यात आली नाही. त्यामुळे उत्तीर्ण झालेल्या बारा कोतवालांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

# गोंदिया-तिरोडा मार्गावर एसटी वेळापत्रक कोलमडले

## अनियमित कारभाराने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

**गोंदिया :** राज्य परिवहन महामंडळाची एसटी बससेवा ग्रामीण भागातील नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी महत्वपूर्ण आहे. एसटीला ग्रामीण क्षेत्राची धमनी म्हणूनही ओळखले जाते. मात्र तिरोडा–गोंदिया महामार्गावरील एसटी बसेसचे वेळापत्रक कोलमडल्याने या सेवेला गालबोट लावण्याचे काम आगाराकडून केले जात आहे. तिरोडा व गोंदिया तालुक्यातील अनेक गावातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक नुकसानीला समोर जावे लागत आहे. एसटीची वाट पाहत शाळेची वेळ निघून जात आहे. शिवाय उशिरा गेल्यास शैक्षणिक नुकसान होवून त्रास सहन करावा लागत आहे. या प्रकारामुळे विद्यार्थी, नागरिक व पालकाकडून रोष व्यक्त केला जात आहे.

"गाव तिथे एसटी' हे ब्रीद समोर ठेवून राज्य परिवहन महामंडळाची सेवा सुरू आहे. ग्रामीण भागात तर एसटीच्या सेवेला मोठे महत्व आहे. परंतु, ग्रामीण क्षेत्रातील नागरिक व विद्यार्थी आता एसटीच्या सेवेने त्रस्त झालेले आहेत. एसटी बस केव्हा येईल, याची खात्री नसल्याने मनस्ताप सहन करावा लागत आहे. ग्रामीण भागातून उच्च शिक्षणाकरीता मोठ्या प्रमाणात विद्यार्थी तालुकास्थळावर जात असतात. यासाठी विद्यार्थी एसटीने प्रवास करीत असतात. यासाठी महामंडळाकडून पासची सुविधाही उपलब्ध करुन दिली जाते.

तिरोडा–गोंदिया या ठिकाणी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही मोठी आहे. यामुळे तिरोडा आगारातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी पास तयार करवून घेतले आहेत. मात्र एसटीचे वेळपत्रक हे फक्त फलकापुरतेच राहिल्याने गावागावातील विद्यार्थ्यांना चांगलाच फटका बसत आहे. वेळेवर बस पोहोचत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शाळेत उशिरा पोहोचल्याने शिक्षकांच्या रागाला समोर जावे लागते. या संदर्भात तिरोडा आगाराशी पत्रव्यवहार करून तक्रार करण्यात आली. पण आगार व्यवस्थापनाकडून सतत दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे तिरोडा–गोंदिया मार्गावरील एसटी बसेस नियोजनच कोलमडले आहे. काही ठिकाणी तर बस येतात व चालक थांबा देत नाही. त्यामुळे



विद्यार्थ्यांना तासोनतास बसची प्रतिक्षा करावी लागत आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष केंद्रीत करुन उपाययोजना करावी, बसच्या वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार करावे, अशी मागणी भाजपचे कार्यकर्ता धनंजय रिनायत यांनी केली आहे.

### आ.विजय रहांगडाले यांच्याकडे तक्रार

तिरोडा आगारातून गोंदियाकडे जाणाऱ्या बसेसचे वेळापत्रक कोलमडले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना मोठा फटका बसत असून शैक्षणिक नुकसान होत आहे. गोंदिया–तिरोडा मार्गावरील गावात बसस्थानकावर विद्यार्थी तासोनतास एसटीची प्रतिक्षा करीत उभे असतात. पण बस केव्हा येईल याचा अंदाज नसल्याने विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रकाराची भाजपचे कार्यकर्ते धनंजय रिनायत यांनी आगाराकडे पत्राच्या माध्यमातून तक्रार केली. पण सतत दुर्लक्ष करण्यात येत आहे. परिणामी धनंजय रिनायत यांनी आ.विजय रहांगडाले यांच्या तक्रार केली असून आ.रहांगडाले यांनी लक्ष देवून सदर समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी धनंजय रिनायत यांनी केली आहे.

# तिरोडा रेल्वे स्थानकावर सोयी सुविधा उपलब्ध करा-आ.रहांगडाले यांची केंद्रीय मंत्र्याकडे मागणी

**तिरोडा:–** तिरोडा रेल्वे स्टेशन हे मुंबई हावडा मार्गावर स्थित असून या ठिकाणी दिल्ली मार्गावर तसेच बिलासपुर मार्गावर मोठ्या प्रमानात तालुक्यातील जनता, शैक्षणिक विद्यार्थी प्रवास करत असतात तसेच अदानी विद्युत प्रकल्प असल्याने येथील कमचऱ्यांना दिल्ली व पुणे येथे ये–जा करावे लागते तिरोडा स्थानकावर सरळ पुणे व दिल्ली जाण्याकरिता कोणतीच ट्रेन नसल्याने मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो



तसेच तिरोडा स्थानकावर दिव्यांग व वृद्ध प्रवाशांना नवीन पुलावरुन चढणे उतरण्याकरिता समस्यांना सामोरे जावे लागते याची दखल घेत तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी तिरोडा रेल्वे स्थानकावर गाडी क्र. १२१२९ व १२१३० हावडा पुणे–पुणे हावडा आझाद हिंद एक्स्प्रेस तसेच १२४०९ व १२४१० ह. निजामुद्दीन रायगढ–रायगढ ह.निजामुद्दीन गोंडवाना एक्स्प्रेस या रेल्वे गाड्याचा थांबा देण्याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्री यांना विनंती केलेली आहे तसेच दिव्यांग व वृद्ध प्रवाशांकरिता स्वचलित जिना किवा उद्वाहन ( लिफ्ट) ची सोय करण्याबाबत विनंती केली आहे

# शहर पोलिसांनी केली साडेतीन लाख रुपयाची नकली बिडी जप्त

**गोंदिया: –** शहर पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या गजानन मंदिर जवळ मामा चौक गोंदिया व छोटा गोंदियाच्या संजयनगर येथे दोन ठिकाणी चार कंपन्यांच्या नकली बिडी तयार करुन बाजारात विक्री करणाऱ्या दोघांवर गोंदिया शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींजवळून ३ लाख ५४ हजार ६९७ रुपयाची नकली बिडी जप्त करण्यात आली. ही कारवाई १७ ऑगस्टच्या सायंकाळी ६:३० वाजता करण्यात आली. यासंदर्भात १८ ऑगस्टच्या पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



गोंदियातील गजानन मंदिराजवळ राहणारा आरोपी रमेश वासुदेव गुप्ता (५५) व हलवाई असोशिएशन जवळ राहणारा आशीफ अहमद कच्छी (५५) या दोघांनी साबळे वाघीरे अॅण्ड कंपनी लिमीटेड (साबळे/ राजकलमल बिडी), देसाई ब्रदर्स लिमीटेड देसाई बिडी, भारत बिडी वर्क प्रा.लिमीटेड, जसवंतभाई अॅण्ड कंपनी या चार कंपनीची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता बनावट बिड्या, रॅपर, लेबल व टिकली जवळ घेऊन बसलेल्या त्या दोघांच्या कारखान्यावर धाड टाकण्यात आली. यात ३ लाख ५४ हजार ६९७ रुपयाची नकली बिडी आरोपींनी विक्री करीता तयार करुन ठेवली होती. या कंपन्यांचे वरिष्ठ तपास अधिकारी अनुप संभाजी कोलप (४०) यांच्या तक्रारीवरुन गोंदिया शहर पोलिसांनी कॉपी राईट कलम ५१, ६३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास सहाय्यक फौजदार मिताराम गणवीर करीत आहेत.

# साथरोग नियंत्रणासाठी सज्ज व्हा!- जि.प.उपाध्यक्ष यशवंत गणवीर

**गोंदिया :** जिल्ह्यातील नागरीकांचे आरोग्य अबाधित ठेवणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. पावसाळ्याच्या दिवसांत जलजन्य व कीटकजन्य आजारांची साथ पसरते. त्यामुळे साथरोग नियंत्रणासाठी सज्ज रहा, असे आवाहन जिल्हा परिषद गोंदियाचे उपाध्यक्ष तथा आरोग्य शिक्षण व क्रीडा समिती सभापती इंजि. श्यशवंत गणवीर यांनी केले. शुक्रवारी (ता. १८ ) जिल्हा परिषद येथे आरोग्य समितीची सभा पार पडली. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

पावसाळ्यात जलजन्य व कीटकजन्य आजारांची साथ पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई गरजेची आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेसा औषध साठा उपलब्ध ठेवा. डेंग्यु, मेंदुज्वर, हिवताप, चिकनगुनिया बाबतचे सर्वेक्षण करुन डास उत्पत्ती स्थाने नष्ट करण्यावर भर देण्यात यावा, विविध जलस्त्रोतांचे पाणी नमुने तपासावे, गटार वाहते करावे. पाणी टाकी व विहिरीचा परिसर स्वच्छ करावा, टीसीएल साठ्याची पाहणी करावी, गावातील पाणीपुरवठा करण्यात येत असल्या योजनांचे सर्वेक्षण करुन जलवाहिनी व व्हॉल्व्हला गळती असल्यास ग्रामपंचायतीने ते बंद करण्याची कार्यवाही करण्याच्या सुचना ग्रामपंचायत स्तरावर देण्याचे निर्देश जिल्हा परिषद गोंदियाचे उपाध्यक्ष तथा आरोग्य शिक्षण व क्रीडा सभापती इंजि. गणवीर यांनी यावेळी दिले.

आरोग्य समितीचे सदस्य तथा जिल्हा परिषद सदस्य डॉ. भुमेश्वर पटले, श्रीमती छायाताई नागपुरे, श्री. पवन पटले, श्रीमती वैशालीताई पंधरे, श्रीमती गिताताई लिल्हारे, श्रीमती सुधाताई रहांगडाले, श्रीमती पौर्णिमाताई ढेंगे, श्रीमती रचनाताई गहाणे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे, सहाय्यक संचालक कृष्ठरोग डॉ. रोशन राऊत, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. नितीन कापसे, तालुका आरोग्य अधिकारी गोरेगाव डॉ. विनोद चव्हाण, तालुका आरोग्य अधिकारी देवरी डॉ. ललित कुकडे, तालुका आरोग्य अधिकारी सालेकसा डॉ. अमित खोडनकर, तालुका आरोग्य अधिकारी अर्जुनी मोरगाव डॉ. विजय राऊत, तालुका आरोग्य अधिकारी तिरोडा डॉ. स्वाती घोडमारे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, जिल्हा साथरोग तज्ञ डॉ. सुशांकी कापसे तथा आरोग्य विभागाचे जिल्हास्तरिय अधिकारी व पर्यवेक्षक उपस्थित होते.

### २८ व २९ ऑगस्टला जिल्हास्तर शालेय रायफल शुटींग क्रीडा स्पर्धा

**गोंदिया :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हास्तर शालेय रायफल शुटींग या क्रीडा स्पर्धेचा कार्यक्रम २१ ऑगस्ट २०२३ असा कळविण्यात आला होता. परंतु सदर खेळाच्या स्पर्धेत काही तांत्रिक कारणामुळे सुधारणा करण्यात येत असून सुधारित तारखा दिनांक २८ व २९ ऑगस्ट २०२३ अशा राहतील. तरी संबंधित तालुका क्रीडा संयोजक व संबंधित शाळांनी झालेल्या बदलाची नोंद घेवून विजयी संघ/खेळाडू यांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांनी कळविले आहे.

# ७० हजाराच्या लाचप्रकरणात वडेगावच्या सरपंचासह तिघे एसीबीसीच्या जाळ्यात

**गोंदिया:–** सडक अर्जुनी तालुक्यातील ग्राम पंचायत वडेगाव येथील सरपंच, उपसरपंचसह दोन सदस्यांना ७० हजार रुपयाच्या लाच प्रकरणात लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने १८ ऑगस्ट रोजी कारवाई करीत ताब्यात घेतले. आरोपी विरुद्ध डूग्गीपार पोलिस स्टेशन येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.तक्रारदार हे बांधकाम साहित्य पुरवठा धारक असून त्यांनी राष्ट्रीय ग्रामीण योजने अंतर्गत ग्रामपंचयात वडेगाव येथे सन २०२०– २१ मधे ग्रामपंचयात निविदेनुसार विविध कामाकरीता बांधकाम साहित्य पुरवठा केलेला होता.

तक्रारदाराला पुरवठा केलेल्या बांधकाम साहित्याच्या मंजूर बिलाचे धनादेशकरीता गैर अर्जदार यांनी १५ लाख ५५ हजार ६९६ रुपयाच्या रकमेवर पाच टक्के प्रमाणे ७५ हजार रूपयाच्या रकमेची मागणी करुन तडजोडी अंति ७० हजार रुपये पंचासमक्ष मागणी करुन लाच प्राप्त करण्याचा प्रयत्न केला.सदर प्रकरणाची पडताळणी १० ऑगस्ट रोजी करण्यात आली.आरोपी लोकसेवक यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून स्वताच्या लाभाकरीता गैरवाजवी फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला. यात आरोपी नामे सरपंच रिना हेमंत तरोने वय ३२, उपसरपंच दिनेश सुनील मुनीश्वर, वय २७, ग्रामपंचायत सदस्य मार्तंड मंसाराम मेंढे वय ३८, ग्रामपंचायत सदस्य श्रीमती लोपा विजय गजभिये वय ५० वर्ष, सर्व ग्राम पंचायत वडेगाव, तालुका सडक अर्जुनी येथील रहिवासी असून यातील १, २, ३, यांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन डुग्गीपार येथे गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

# मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी क्रीडा स्पर्धा आवश्यक-अनिल पाटील

## राज्य राखीव पोलीस बल क्रीडा स्पर्धा समारोप



**गोंदिया :** आजच्या धकाधकीच्या जीवनात स्वतःच्या आवडीनिवडी जोपासण्यासाठी वेळ मिळत नाही अशी आपली नेहमीच तक्रार असते. मात्र कामाचा ताण कमी करण्यासाठी खेळा सारखा उत्तम प्रकार कुठलाच नसून प्रत्येकाने आपल्या मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी खेळाचा छंद जोपासला पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले.

भारत राखीव बटालियन क्रमांक दोन, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १५ गोंदिया येथे ११ व्या आंतर कंपनी क्रीडा स्पर्धेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाकरिता प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे नगरपरिषद गोंदियाचे मुख्याधिकारी करण चव्हाण, विविध शाळांचे प्राचार्य, शेजारील गावातील सरपंच उपस्थित होते.

१६ ते १८ ऑगस्ट २०२३ पर्यंत भारत राखीव बटालीयन परसवाडा बिरसी च्या प्रांगणात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत भारत राखीव बटालियनच्या संपूर्ण जवानांनी भाग घेतला. विविध सांघिक खेळा सोबतच वैयक्तिक क्रीडा स्पर्धांचे जवानांकरिता आयोजित करण्यात आले होते. प्रामुख्याने फुटबॉल, बास्केटबॉल, हँडबॉल, हॉकी, खो–खो, कबड्डी इत्यादी सांघिक तसेच गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी यासह धावण्याच्या संपूर्ण शर्यती २१ किलोमीटर मॅरेथॉनचे सुद्धा आयोजन या क्रीडा स्पर्धेत करण्यात आले.

जवानांसोबतच कुटुंबियांकरिता सुद्धा मनोरंजक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांकरिता संगीत खुर्ची, छोट्या मुलींकरिता नींबू चमचा, बारा वर्षावरील मुलांकरिता पोतदार तर निमंत्रित पाहुणे मंडळी व गटातील पोलीस अधिकारी यांचेकरिता दोरीखेच या खेळाचे आयोजन केले होते. या संपूर्ण क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन संपूर्ण जवानांनी या कीडा स्पर्धांचा आस्वाद घेतला.

गटाचे समादेशक अमोल गायकवाड यांच्या अत्युत्कृष्ट नियोजनामध्ये या संपूर्ण क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. गटाचे समादेशक सहाय्यक प्रमोद लोखंडे, सहाय्यक समादेशक मंगेश शेलोटकर, कैलास पुसाम, के.बी. सिंग, श्रीकृष्ण हिरपूरकर यांनी विशेष तयारी करुन घेतली होती. ग्राउंड मार्किंग पासून तर संपूर्ण क्रीडा स्पर्धांच्या योग्य नियोजनाकरिता जबाबदारीचे वाटप संपूर्ण पोलीस अधिकाऱ्यांना करुन देण्यात आले होते. जिल्हा पोलीस दलाची सुद्धा क्रीडा स्पर्धांचे आयोजनामध्ये विशेष मदत प्राप्त झाली.

कार्यक्रमाच्या सांगता समारंभात विशेष प्रस्तुती के.के. इंग्लिश स्कूल आमगाव येथील विद्यार्थ्यांचे देशभक्तीपर समूह नृत्य हे होते. क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी जवान यांचेकरिता आदित्य टाटा कार्स नागपूर यांचे तर्फे टी–शर्ट्स तथा भुवन सिंग रहांगडाले यांचे कडून बक्षिसांचे प्रायोजकत्व देण्यात आले होते. सांगता समारंभाचे वेळी गटाचे समादेशक यांनी प्रास्ताविक भाषणात खेळाचे महत्व किती आवश्यक आहे व त्याचा आपल्या दैनंदिन जीवनात काय फायदा होतो याचे महत्त्व विशद केले. प्रमुख अतिथी यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा देऊन गौरव केला.

याप्रसंगी बटालियन शेजारील छीपिया या गावातील प्रेरणा माहूरकर हिने नीट २०२३ या परीक्षेत कठोर परिश्रम करुन यश संपादन केल्याने तिची निवड वैद्यकीय शिक्षणाकरिता पुणे येथील शासकीय महाविद्यालयात झाल्याने तिचे व तिच्या पालकांचा बटालियन तर्फे सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर रिया मंडल हिने वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग या स्पर्धेत जम्मू कश्मीर या ठिकाणी भारताचे प्रतिनिधित्व करुन गोल्ड मेडल मिळविल्याने तिचा सुद्धा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर खेळाडूंचे सुंदर असे मार्च पास बक्षीस वितरण व विविध कार्यक्रमाचा सोहळा अतिशय मोहक पद्धतीने साजरा करण्यात आला.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रबद्ध संचलन पोलीस उपनिरीक्षक सुनील चव्हाण यांनी केले, तर उपस्थितांचे आभार समादेशक सहाय्यक प्रमोद लोखंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता गटातील संपूर्ण पोलीस अधिकारी, अमलदार, अनुगामी कर्मचारी यांनी अतिशय परिश्रम घेतले व हा कार्यक्रम यशस्वी केला.

# अर्जुनी मोरगाव तालुक्यात निराधार योजनेचे १४ हजार ८ लाभार्थी

**अर्जुनी मोरगाव:–** केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या निराधार योजनेत अर्जुनी मोरगाव तालुक्यात १४ हजार आठ लाभार्थी असून त्यांना महिन्याकाठी दोन कोटी दहा लाख बारा हजार अनुदान वाटप करण्यात येत असल्याची माहिती प्राप्त आहे.

गेल्या अनेक वर्षापासून देशात निराधार अनुदान वाटप योजना सुरू आहे. या योजनेत केंद्र व राज्य सरकार मिळून अनुदान दिले जाते. सुरुवातीच्या काळात या योजनेतून निराधार लाभार्थ्यांना ६०० रुपये दरमहा अनुदान दिले जायचे, माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री राजकुमार बडोले यांचे कार्यकाळात चारशे रुपये वाढ झाल्याने लाभार्थ्यांना एक हजार रुपये दरमहा अनुदान मिळत होते. आता शिंदे, फडणवीस सरकारने या अनुदानात पाचशे रुपयांची वाढ केल्याने आता जुलै २०२३ पासून प्रति निराधाराला १५०० रुपये अनुदान दिल्या जाणार आहे. एकूण नऊ योजनेतून निराधाराची निवड केली जाते. अर्जुनी मोरगाव तालुक्यात इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजनेत




## दर महिन्याचा अनुदान २ कोटी १० लाख १२ हजार

५ हजार ८५ लाभार्थी, इंदिरा गांधी विधवा योजनेत १७७२ लाभार्थी, इंदिरा गांधी अपंग योजनेत ११३ लाभार्थी, संजय गांधी सर्वसाधारण योजनेत १८६० लाभार्थी, संजय गांधी अनुसूचित जाती योजनेत ७८५ लाभार्थी, संजय गांधी अनुसूचित जमाती योजनेत ३७४ लाभार्थी , श्रावणबाळ सर्वसाधारण योजनेत २८२१ लाभार्थी, श्रावण बाळ अनुसूचित जाती योजनेत ७२२ लाभार्थी, श्रावण बाळ अनुसूचित जमाती योजनेत ४७६ लाभार्थी, असे एकूण १४ हजार आठ लाभार्थी आहेत, या सर्व लाभार्थ्यांना राज्य व केंद्र शासनाकडून दरमहा अनुदान दिल्या जातो.

अर्जुनी मोरगाव तालुक्यात आता जुलै २०२३ पासून प्रति लाभार्थी दीड हजार रुपये प्रति माहे प्रमाणे एकूण दर महिन्याला दोन कोटी दहा लाख बारा हजार रुपये महिन्याला वाटप होणार असल्याची माहिती तहसीलदार अनिरुद्ध कांबळे यांनी दिली. निराधार योजनेचे पात्र लाभार्थी निवडण्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक अशासकीय समिती असते. या समितीचे अध्यक्ष व सदस्य हे सत्ताधारी पक्षातील असतात. या समितीच्या सभेमध्ये तालुक्यातून आलेल्या सर्व लाभार्थ्यांचे अर्ज तपासून ते मंजूर केल्या जातात. अर्जुनी मोरगाव तालुक्यात बरेच दिवस निवड समितीची नव्हती. आता कुठे नवीन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

# कोणताही दिव्यांग बांधव लाभापासून वंचित राहू नये-बच्चू कडू



**गोंदिया :** दिव्यांग बांधवांच्या जीवनामध्ये नवचैतन्य निर्माण करण्याकरीता शासनाद्वारे दिव्यांगांसाठी नवनविन उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे दिव्यांग बांधवांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपले जीवन सुखकर करावे. कोणताही दिव्यांग बांधव शासनाच्या लाभापासून वंचित राहू नये, असे प्रतिपादन आमदार तथा दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष व मुख्य मार्गदर्शक ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मरारटोली, गोंदिया येथे १७ ऑगस्ट रोजी आयोजित "दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' अभियानाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे हे होते.

यावेळी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) गोविंद खामकर, नगर परिषदेचे मुख्याधिकारी करण चव्हाण, जि.प.समाज कल्याण समिती सभापती पुजा सेठ, रेल्वे विभागाचे नागपूर मंडळाचे सहायक वाणिज्य प्रबंधक अविनाशकुमार आनंद, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे, समाज कल्याण अधिकारी संजय गणवीर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आमदार बच्चू कडू पुढे म्हणाले, दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र मंत्रालय सुरु करण्यात आलेले आहे. दिव्यांग बांधवांचे हित लक्षात घेवून त्यांच्या अडिअडचणींवर मात करण्यासाठी समाज कल्याण विभागात येत्या दोन महिन्यात २ हजार कर्मचाऱ्यांची पदभरती करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचा निधी दिव्यांग बांधवांच्या सोई-सुविधेकरीता उपलब्ध करुन देण्यासाठी राखून ठेवण्यात यावा. जिल्ह्यातील प्रत्येक दिव्यांग बांधवांना णऊखऊ कार्डचा लाभ देण्यात यावा. मी माणूस आहे असे भान ठेवून काम करावे. जिल्हा प्रशासनाने मनापासून काम करण्याची गरज आहे. दिव्यांग बांधवांसाठी अधिक चांगल्या प्रकारचे काम करता येईल याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष्य देणे गरजेचे आहे. सदर अभियान नियमीतपणे सुरु राहणार आहे, त्यामुळे दिव्यांग बांधवांनी लाभ घेण्यासाठी चिंता करण्याची आवश्यता नाही, असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे म्हणाले की, जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना सोयी-सवलती देण्यासाठी जिल्हा प्रशासन तत्पर आहे. त्यामुळे दिव्यांग बांधवांनी शासनाच्या अधिकाधिक योजनांचा लाभ घेऊन आपले जीवन सुखकर करावे.

अनिल पाटील म्हणाले की, दिव्यांग बांधवांच्या अडिअडचणीला सामोरे जावून कामे करण्यात यावी. जिल्ह्यातील सर्व दिव्यांगांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले. गोंदिया येथील जिल्हा समाज कल्याण कार्यालयातील रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावे, कार्यालयात मनुष्यबळ असेल तर समाजाच्या हिताचे काम करणे सोईचे होईल असे पूजा सेठ यांनी सांगितले.

यावेळी विविध प्रकारचे स्टॉल्स लावण्यात आले होते. त्यामध्ये UDID कार्ड तयार करणे, दिव्यांग स्वयंरोजगार केंद्र, जिल्हा दिव्यांग पुनर्वास केंद्र, समग्र शिक्षा-समाविक्षीत शिक्षा, ओम दिव्यांग स्वयंसहाय्यता समुह, जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, समदृष्टी क्षमताधिकार व संशोधन मंडळ, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती (उमेद), रेल्वे विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, किरण मानसिक आरोग्य पुनर्वसन केंद्र आदिंचा यात समावेश होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा समाज कल्याण अधिकारी संजय गणवीर यांनी केले. सुत्रसंचालन डिंपल चौधरी यांनी केले. कार्यक्रमास दिव्यांग बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलाठ्यांना ग्रामपंचायतीला द्यावे लागणार त्यांच्या उपस्थितीचे वेळापत्रक




**मुंबई :-** गावातील जमीनींचा आणि पिकांचा हिशेब ठेवणाऱ्या तलाठ्याला आता त्याच्या उपस्थितीचे वेळापत्रक ग्रामपंचायतीला देऊन कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. तलाठी सज्जाच्या ठिकाणी उपस्थित रहात नसल्याच्या वारंवार तक्रारी येत असल्याने तसेच सामान्य नागरिकाची गैरसोय होत असल्याने निर्णय घेण्यात आला आहे.

तलाठ्यांना सज्जातील गावांना भेटी देणे, पंचनामे, स्थळ पाहणे, वरिष्ठ कार्यालयांमध्ये असणाऱ्या बैठका, तपासण्या इत्यादी कामांसाठी उपस्थित रहावे लागते. सध्या तलाठी पदाच्या रिक्त जागांमुळे एका तलाठ्याकडे एकापेक्षा जास्त सज्जाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. तलाठ्यावर कामाचा बोजा वाढला असून अनेकदा सज्जा मुख्यालयीन कार्यालयांमध्ये तलाठ्याला उपस्थित राहता येत नाही. परिणामी, नागरिकांना जमीन, पिके, वारसा हक्काच्या नोंदी अशा अनेक कामांसाठी तलाठी कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. नागरिकांची ही गैरसोय होऊ नये यासाठी तलाठ्याने नियोजित दौरे, बैठका, कार्यक्रम याबाबत असणारे वेळापत्रक तलाठी कार्यालय तसेच संबंधित गावच्या ग्रामपंचायतीत दर्शनी भागात आगाऊ वेळेत लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.वेळापत्रकासोबतच तलाठ्यांनी कार्यालयाच्या दर्शनी भागात आपला दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक ठळक दिसेल अशा स्वरुपात लावण्यासही सांगण्यात आले आहे. संबंधित वेळापत्रक मंडळ अधिकारी व नायब तहसीलदार यांना देखील पाठवण्यात यावे अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

गाव पातळीवर तलाठी हे नागरिकांसाठी महत्त्वाचे पद असल्याने वारंवार वेगवेगळ्या प्रकारच्या दाखल्यांसाठी, जमीन विषयक कामांसाठी नागरिकांचा तलाठी कार्यालयाशी संपर्क येतो. सद्यस्थितीत तलाठी पदाची ५ हजार ३८ पदे रिक्त आहेत. भरती प्रक्रिया सुरू असून ही पदे भरली जाण्यास उमेदवार उपलब्ध होईपर्यंत बराच कालावधी जाणार आहे. दरम्यान नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून शासनाने परिपत्रक जारी केले आहे.

सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख / कार्यालयीन प्रमुख / तलाठी कार्यालये यांच्या निदर्शनास सदर निदेश आणावेत. असे आदेश शासनाने दिले आहेत. त्यामुळे आता तलाठ्यांना कामाच्या वेळेत मिटींगला गेलो किंवा अन्य कारणे देऊन दांडी मारणे अडचणीचे ठरणार आहे.

# नक्षलग्रस्त गडचिरोली-गोंदियात ७१ हजार कुटुंबांना मोफत डीटीएच कनेक्शन देणार

**गोंदिया:-** देशपातळीवर सर्व नक्षल प्रभावित जिल्ह्यांमध्ये डीटीएच कनेक्शन मोफत देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्याचा महाराष्ट्रातील गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यांतील ७१ हजार कुटुंबांना लाभ मिळणार आहे लाभार्थी कुटुंबीयांची यादी पोलिसांकडून तयार करण्यात येत असल्याची माहिती गडचिरोलीचे पोलिस उपमहानिरीक्षक संदीप पाटील यांनी दिली. गोंदिया जिल्ह्यामधील नक्षल प्रभावित क्षेत्रातील १५९ गावांत केंद्रीय गृह विभाग आणि केंद्रीय माहिती प्रसारण विभागाच्या वतीने तब्बल ११५६ कुटुंबांना डीटीएच कनेक्शन मोफत दिले जाणार आहे. त्याअंतर्गत या कुटुंबांच्या घरात सेटटॉप बॉक्स आणि डीटीएचसाठीची डिश दिली जाणार आहे.




या भागातील जनतेला इन्फर्मेशन कनेक्टिव्हिटी मिळावी आणि नक्षलवाद्यांच्या खोट्या प्रचारापासून त्यांची सुटका व्हावी या उद्देशाने ही अभिनव योजना राबवण्यात येत असल्याचे पाटील यांनी सांगितले.

### योजनेचे काय उद्दिष्ट?

**या योजनेद्वारे देश विरोधी शक्तींचा अपप्रचार थांबवणे, हेही प्रमुख उद्दिष्ट आहे. सीमावती भागात चीन आणि पाकिस्तान सारख्या शत्रू राष्ट्र अनेक प्रकारचा अपप्रचार करीत असतात. तर नक्षल प्रभावित भागात नक्षलवादी बॅनर, पोस्टर तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून देश विरोधात अपप्रचार करत असतात. याला प्रतिबंध लावण्यासाठी ही नवीन योजना आहे. लवकरच या कुटुंबांच्या घरी मोफत डीटीएच लागलेले पाहायला मिळतील.**

केंद्रीय गृह विभाग आणि माहिती व प्रसारण विभागाकडून ही अभिनव योजना सुरू केली. गडचिरोली आणि गोंदिया या दोन्ही जिल्ह्यांतील नक्षल प्रभावित क्षेत्रातील ७१ हजार कुटुंबांना योजनेंतर्गत सेट टॉप बॉक्स आणि डीटीएचसाठीची डिश दिली जाणार आहे. याशिवाय चीनच्या सीमेवरील जिल्ह्यांमध्येही इन्फर्मेशन कनेक्टिव्हिटीची योजना राबवली जाईल. सीमेवरील किंवा संवेदनशील भागातील जनतेला इन्फर्मेशन कनेक्टिव्हिटी मिळावी आणि त्यांच्या माध्यमातून अचूक माहिती पोहोचावी, येथील जनतेला देशविघातक शक्तींच्या अपप्रचारापासून वाचवणे हा या योजनेचा हेतू आहे. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा अजूनही विकासाच्या छोट्या छोट्या गोष्टीपासून वंचित असलेला जिल्हा आहे. गडचिरोलीत शासनाला आपल्या योजनांची अचूक माहिती पोहोचवणे हेही एक मोठे आव्हान असते. त्यासाठीच केंद्र सरकारने केंद्रीय गृह विभाग आणि माहिती व प्रसारण विभागाच्या माध्यमातून योजना आखली आहे.नक्षल प्रभावित भागातील जनतेला इन्फॉर्मेशन कनेक्टिव्हिटी मिळावी आणि नक्षलवाद्यांच्या खोट्या प्रचारापासून त्यांची सुटका व्हावी, या उद्देशाने ही अभिनव योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पुढील काही महिन्यांमध्ये देशपातळीवर सर्व नक्षल प्रभावित जिल्ह्यांमध्ये लाखो डीटीएच कनेक्शन मोफत दिले जाणार आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांनी दिली जिल्हा बालविवाह मुक्त करण्याबाबतची शपथ




**गोंदिया :** जिल्हा बाल संरक्षण कक्ष गोंदिया यांच्या वतीने आयोजित जिल्हा बाल संरक्षण समिती गोंदिया आढावा सभेमध्ये जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना गोंदिया जिल्हा बालविवाह मुक्त करण्याबाबतची शपथ दिली.

जिल्हाधिकारी श्री. गोतमारे पुढे बोलताना म्हणाले की, बालविवाह हा कायद्याने गुन्हा आहे व बाल हक्काचे उल्लंघन आहे. बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ अंतर्गत १८ वर्षाखालील मुलीचे व २१ वर्षाखालील मुलाचे लग्न करणे हा कायदेशीर गुन्हा आहे. बालविवाह करणाऱ्या किंवा त्यात कोणत्याही प्रकारे मदत करणाऱ्या किंवा सहभागी झालेल्या कोणत्याही व्यक्तीला दोन वर्षाचा तुरुंगवास आणि एक लाख रुपये दंड अशी शिक्षा होऊ शकते. त्याचप्रमाणे भविष्यात ज्या ठिकाणी सामुहिक विवाह सोहळा पार पडेल त्यांची सर्व माहिती आधीच घ्यायला हवी असे निर्देश दिले व एसेस टू जस्टीस अंतर्गत चालणाऱ्या बालविवाह मुक्त भारत अभियानाला शुभेच्छा दिल्या.

जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे यांनी जिल्हा बाल संरक्षण कक्षाचा आढावा मांडला, यामध्ये इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी (बालविवाह मुक्त भारत अभियान), दामिनी पथक पोलीस विभाग, चाईल्डलाईन यांच्या सहकार्याने जिल्ह्यात तीन बालविवाह थांबविल्याची माहिती व एका बालमजुराची सुटका केल्याची माहिती दिली. यानंतर बालकल्याण समितीचे अध्यक्ष देवका खोब्रागडे यांनीही आढावा सादर केला.

इंडियन सोशल वेलफेअर सोसायटीचे संचालक अशोक बेलेकर यांनी सांगितले की, नोबेल पारितोषिक विजेते कैलास सत्याथी चिल्ड्रन फाउंडेशन दिल्ली व इंडियन सोशल वेल्फअर सोसायटी गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने गोंदिया जिल्ह्यात बालविवाह मुक्त भारत अभियान सुरू आहे.

या माध्यमातून सर्व गांव पातळीवर शहरी भागात शाळा असे सर्व ठिकाणी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत आणि गावागावात, घरोघरी जाऊन व्यक्तिगत, कुटुंबातील लोकांना व सामुहिक स्तरावर उपस्थितांना बालविवाह न करण्याबाबतची तसेच बाल तस्करी, बाल लैंगिक शोषण आणि बालकामगार मुक्त जिल्हा याबद्दल प्रतिज्ञा देत आहेत. जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी तुषार पौनीकर यांनी बालकांसाठी असलेल्या कायद्याची माहिती सांगितली.

यावेळी जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांचे हस्ते बालविवाह मुक्त भारत अभियानाच्या पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले. सभेला जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पवनीकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे, बालकल्याण समिती अध्यक्ष देवका खोब्रागडे, इंडियन सोशल वेल्फेअर सोसायटीचे संचालक अशोक बेलेकर, बाल न्याय मंडळ सदस्य वंदना दुबे, बालकल्याण समिती सदस्य सर्वश्री मनोज राहांगडाले, अलका बोकडे, जयश्री कापगते, वर्षा हलमारे, बाल न्याय मंडळ सदस्य मेघना गभणे, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक कुणाल गुंडच्यावर, आयएसडब्ल्यूएस जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर पटले, चाईल्डलाईन सेंटरचे कोऑर्डिनेटर विशाल मेश्राम तसेच शिक्षण विभाग, पोलीस विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, समाज कल्याण, जिल्हा बाल संरक्षण कक्ष व संबंधित विभागातील अधिकारी उपस्थित होते.

### २९ व ३० ऑगस्टला जिल्हास्तर शालेय तलवारबाजी स्पर्धा

**गोंदिया :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हास्तर शालेय तलवारबाजी या क्रीडा स्पर्धेचा कार्यक्रम ४ ते ५ सप्टेंबर २०२३ असा कळविण्यात आला होता. परंतु सदर खेळाच्या स्पर्धेत काही तांत्रिक कारणामुळे सुधारणा करण्यात येत असून सुधारित तारखा दिनांक २९ व ३० ऑगस्ट २०२३ अशा राहतील. तरी संबंधित तालुका क्रीडा संयोजक व संबंधित शाळांनी झालेल्या बदलाची नोंद घेवून विजयी संघ/ खेळाडू यांनी स्पर्धेत सहभागी व्हावे.

# लैंगीक अत्याचार करणाऱ्या आरोपीला ३० वर्षाचा सश्रम कारावास

**गोंदिया:-** आपल्या काकाचे घरी पाळण्यावर एकटी झुलत असलेल्या ६ वर्षाच्या चिमुकलीला चॉकलेटचे आमिष देत तिच्यावर लैंगीक अत्याचार करणाऱ्या आरोपीला प्रमुख जिल्हा व विशेष सत्र न्यायालयाने ३० वर्षाचा सश्रम कारावास व १० हजार रूपये दंड ठोठावला.ही सुनावणी १८ ऑगस्ट रोजी प्रमुख जिल्हा व विशेष सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे यांनी केली आहे.

अर्जुनी-मोरगाव तालुक्याच्या केशोरी पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या ६ वर्षाच्या मुलीवर आरोपी महेश टेंभुर्णे (३२) रा. ता. अर्जुनी/मोरगाव, जि. गोंदिया याने अत्याचार केला होता. आरोपी हा त्याच गावातील रहिवासी असून ओळखीचा फायदा घेत त्याने ६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला. २७ ऑक्टोबर २०२१ ला ती चिमुकली आपल्या घरा शेजारी काकाचे घरी पाळण्यावर एकटी झुलत होती. आरोपीने तिला एकटी पाहून चॉकलेटचे आमिष देत घरामागे असलेल्या संडासच्या खड्ड्याकडे नेले. चिमुकलीला चॉकलेटकरिता १० रूपयाची नोट देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर चिमुकली ही घरी रडत-रडत आली. तिच्या आईने तिला रडण्याचे कारण विचारता तिने घडलेली माहिती दिली. पिडितेच्या आईने पोलीस स्टेशन केशोरी येथे २७ ऑक्टोबर २०२१ रोजी आरोपीविरूद्ध तकार दाखल केली होती. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप इंगळे यांनी केला होता. एकंदरित आरोपीचे वकील व अतिरिक्त सरकारी वकील कैलाश खंडेलवाल यांच्या सविस्तर युक्तीवादानंतर प्रमुख जिल्हा व विशेष सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे यांनी आरोपीविरूद्ध सरकार पक्षातर्फे सादर साक्षदारांची साक्ष, वैद्यकीय अहवाल, इतर कागदोपत्री पुरावे ग्राहय धरुन आरोपी महेश टेंभुर्णे (३२) ता. अर्जुनी/मोरगाव, जि. गोंदिया याला शिक्षा सुनावली.

# संविधानाची मोडतोड थांबवायला हवी

## निर्भय बनो सभेत डॉ. विश्वंभर चौधरी यांचे आवाहन, मोदी-शहांवर टीका







**नागपूर:** संविधान व लोकशाहीची सुरु असलेली मोडतोड थांबविण्याची वेळ आली आहे. त्यासाठी देशातील विरोधी पक्षांनी किमान चारशे जागांवर एकास एक लढत होईल, यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. येणारी लोकसभा निवडणूक मोदी-शहा विरुद्ध आम्ही भारतीय अशी आहे. या या निवडणुकीत मोदी-शहा यांचा पराभव करणे, हीच निर्भय बनो या व्यापक लोकचळवळीची स्पष्ट भूमिका असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व निर्भय बनोचे प्रणेते डॉ. विश्वंभर चौधरी यांनी केले. गुरुवारी सायंकाळी सिव्हील लाईन्समधील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात झालेल्या सभेत ते बोलत होते.

या सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संपादक प्रा. सुरेश द्वादशीवार होते. ज्येष्ठ गांधीवादी नेत्या लीलाताई चितळे, ॲड. असिम सरोदे मंचावर उपस्थित होते. या सभेला भरगच्च गर्दी झाली होती. त्यामुळे अनेकांना उभे राहूनच भाषणे ऐकावी लागली.

डॉ.चौधरी म्हणाले, सांगली व अहमदनगर हे दोन्ही जिल्हे भगव्या प्रयोगशाळा होत आहे. सावरकरांना राष्ट्रपुरुष मानायला आम्ही तयार नाही. महाराष्ट्रातील तीन-चार जिल्हे वगळता सावरकरांचा देशात कुठेही प्रभाव नव्हता. आज हे सावरकरांना राष्ट्रपुरुष म्हणतात. उद्या हेडगेवार व गोळवलकरांना राष्ट्रपुरुष म्हणायला सांगतील. देशात हिंदुराष्ट्र आले तर महिलांना पुन्हा सती जाण्याची तयारी ठेवावी लागेल. संविधान जाऊन त्या जागी मनुस्मृती लागू होईल, मात्र हे आम्ही कुठल्याही स्थितीत होऊ देणार नाही.

संघ, नितीन गडकरी व देवेंद्र फडणवीस यांच्यावर डॉ. चौधरी यांनी प्रखर टीका केली. ते म्हणाले, आज देशात सुरु असलेल्या भ्रष्टाचारावर बोलण्याची हिंमत सरसंघचालक मोहन भागवत दाखवत नाहीत. देशात एक भंपक राष्ट्रवाद आणण्याचे जोरकस प्रयत्न या मंडळींनी सुरु केले आहेत.

### एकात्मतेनंतरच लोकशाही सुरळीत होईल-प्रा.द्वादशीवार

**माणसा-माणसात दुरावा निर्माण करणे हे अनैसर्गिक आहे आणि तेच सध्या देशात सुरु आहे. ज्या दिवशी देशात खऱ्या अर्थाने एकात्मता येईल त्या दिवशी लोकशाही सुरळीत होईल, असे अध्यक्षीय भाषणात प्रा. सुरेश द्वादशीवार म्हणाले. पदवीशुन्य प्रधानमंत्री, तडीपार गृहमंत्री, शिक्षणाची गंध नसलेली बाई शिक्षणमंत्री हे सारे देशातील सुबुद्ध नागरिकांनी खपवून घेतले, हे दुदैवी असल्याचेही ते म्हणाले.**

### ही विचारी डोक्यांची ही लढाई-ॲड.सरोदे

**मोदी व शहा यांच्या विरोधात देशवासीयांनी निर्भयपणे पुढे येण्याचे आवाहन ॲड. असिम सरोदे यांनी केले. अमेरिकेत लोकांनी ट्रम्प यांना निवडून दिले होते. मात्र त्यांची चूक त्यांनी सुधारली. आता आपल्याला आपली चूक दुरुस्त करण्याची संधी आहे. मोदी व शहा हे चेहरे आहेत आणि संघ ही प्रवृत्ती आहे. तिचा आपण विरोध केला पाहिजे. विषारी डोक्याच्या माणसांविरुद्ध विचारी डोक्यांची ही लढाई असल्याचेही ॲड. सरोदे म्हणाले. प्रारंभी प्रास्ताविकात प्रा. शरद पाटील यांनी निर्भय बनो चळवळीविषयी माहिती दिली. कार्यक्रमाला माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, आमदार सुनील केदार, आमदार विकास ठाकरे यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.**

गडकरींच्या विकासकांमामुळेच आज हिमाचल प्रदेश, उत्तराखंड ही राज्ये विनाशाच्या तोंडावर आली आहेत. या राज्याच्या राजकारणाचे जेवढे अवमूल्यन फडणवीस यांनी केले तेवढे आजवर कुणीही केले नाही. आज केंद्रात भाजपकडे जसे बहुमत आहे. तसेच बहुमत यापुर्वी काँग्रेसकडेही होते, पण ते कधी माजले नाहीत, अशी टीका केली.

# जिल्ह्यात जलजीवन मिशन चमू दाखल



**गोंदिया:** जलजीवन मिशनच्या मागदर्शक सुचनेप्रमाणे गावात केलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी राष्ट्रीय जलजीवन मिशनची चमू जिल्ह्यात दाखल झाली असून १५ ऑगस्ट रोजी जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. यानुसार १६ ते १८ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत केलेल्या कामाची तपासणी करण्यात आली. यात जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत केलेल्या कामाची तपासणी करण्यात आली. यात जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी तालुक्यातील १६ गावांची निवड करुन या गावातील कामांची व राबविणाऱ्या अभियानाची तपासणी केली.

जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत विविध विकासकामे करण्यात येत असून अनेक गावातील कामे पूर्णत्वास आली असताना अनेक गावातील कामे प्रगतीपथावर आहेत. दरम्यान, गावात स्वच्छ पाणीपुरवठा केला जातो का? गावात स्वच्छता, त्याचबरोबर पाण्याची गुणवत्ता, शुद्धता व गावात महिला समिती, पाणीपुरवठा समिती स्थापन केली आहे किंवा नाही या बाबींचा तपास या चमूच्या माध्यमातून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रीय स्तरावरुन या समितीची निवड केली असून समितीमार्फत केंद्र शासनाला तसा अहवाल सादर करणार आहे.

### १६ गावात झाली तपासणी

**जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या १६ गावांची तपासणी करण्यात आली. यात १६ ऑगस्ट रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील परसटोला, गोठणगाव, येरंडी दरे, रामपुरी, जांभळी, १७ ऑगस्ट रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील बाराभाटी, दाभना, अरततोंडी तर सडक अर्जुनी तालुक्यातील राजगुडा, मंदितोला, पांढरवाणी व १८ ऑगस्ट रोजी सडक अर्जुनी तालुक्यातील शिवणटोला, घाटेगाव, खोडशिवनी, खैरी, मुंडीपार गावात तपासणी करण्यात आली.**

### यांची होती उपस्थिती

**या चमूमध्ये राष्ट्रीय जल जीवन मिशन नवी दिल्लीचे वॉश एक्सपर्ट अनिलकुमार बाहरी, प्रकाश समर यांनी तपासणी केली असून तपासणी पूर्व बैठकीत पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर, जि.प. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुमित बेलपत्रे, शाखा अभियंता प्रशांत टेंभुर्णीकर, आशिष अडमे, कनिष्ठ अभियंता मानकर, नखाते, भीमटे, नाबार्डचे शेनवर, वाघमारे भुवैज्ञानिक वालदे, यांत्रिकी विभागाचे वानखेडे, पाणी व स्वच्छता विभागाचे सूर्यकांत रहमतकर, राजेश उखलकर, शोभा फटिंग, तृप्ती साकुरे, मुकेश त्रिपाठी, लॅब टेक्नेशियन गराडे, बीआरसी हेमराज अंबुले, आयएसए कर्मचारी नितेश चचाणे, गिरीजाशंकर बघेले उपस्थित होते.**

यानुसार जिल्ह्यातील सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील १६ गावांची निवड केली आहे. या १६ गावात १६ ते १८ ऑगस्ट या तीन दिवसाच्या कालावधीत या चमुद्वारे तपासणी अभियान राबविण्यात आले. दरम्यान, गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे कार्य व जवाबदारी आणि सर्वांना मुबलक, शुद्ध गुणवत्तापूर्ण, पुरेसे पाणी नियमित मिळावे. याबाबत या गावातील ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व नागरिकांना चमुद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. तर गावात जलजीवन मिशन व १५ वा वित्त आयोग, मनरेगा, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत झालेल्या कामाची तपासणीही यावेळी केली.